राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/९१
निर्णय दिनांक- २२ मार्च, २००७.

१. नारायण बाबुराव देशमुख, --अपिलकर्ता.
मु.पो.मंगरुळ (ख.)
तालूका- घनसांगवी, जि.जालना.

<u>विरुध्द</u>

१. जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी.
तालूका कृषी अधिकारी,
घनसांगवी, जि.जालना.

२. अपिलिय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, परतूर
जिल्हा- जालना.

३. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
जालना. जि.जालना.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ मार्च, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री.नारायण बाबुराव देशमूख, रा.मंगरुळ (ख.)तालूका- घनसांगवी, जि.जालना (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल) हे हजर होते. जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, घनसांगवी (येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) श्री.के.के.ढेपे तसेच अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी

परतूर हे गैरहजर आहेत. (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.), तथापि त्यांचे वरिष्ठ जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी श्री.एस.एल.जाधव हे उपस्थित आहेत.

अर्जदार यांने या प्रकरणी सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- २६-१०-२००६ रोजी अर्ज करुन खालीलप्रमाणे माहिती मागविली होती.

" मंगरुळ महापुर शेती पीक नुकसान अनुदान यादी मिळणे बाबत. "

सदर माहिती अर्जदाराने व्यक्तीशः अपेक्षिली होती.

सदर अर्जानूसार जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ११-१२-२००६ रोजी अर्जदारास माहिती पुरविली सदर माहिती मिळाल्या पित्यर्थ अर्जदाराने दिनांक- २६-१२-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यांची स्वाक्षरी करुन पोंच दिली आहे.

या माहितीच्या संदर्भात अर्जदाराने प्रथम अपिलिय अधिका-याकडे कोणतेही अपिल केले नाही व त्याची कबुली अर्जदाराने आज सुनावणीमध्ये दिली आहे.

अर्जदार यांनी वरील अर्जा बरोबरच जनमाहिती अधिकारी यांचेकडे दोन वेगवेगळे अर्ज दिलनांक- २६-१०-२००६ रोजी मंगरुळ येथील कपासी लाळया रोग, शासन अनुदान लाभार्थीची यादी मिळणे संदर्भात केला होता. अर्जदाराने मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यावेळी अनुदाना अभावी माहिती तयार नसल्याने जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक/ ताकृअ/ माहिती अ./१५३५/२००६, दिनांक-२३-११-२००६ अन्वये अर्जदारास असे कळविले की, " आपणास यादी, अनुदान प्राप्त झालेनंतर अनुदान रक्कम टाकल्यानंतर आपणास यादी पुरविण्यात येईल, याची नोंद घ्यावी. "सदर पत्र अर्जदारास मिळाले नसल्याचे आज अर्जदाराने सुनावणीमध्ये सांगितले. त्याच बरोबर अर्जदारास हे पत्र मिळाले असल्याची पोंच जनमाहिती अधिकारी यांचेकडेही असल्याचे दिसून येत नाही. अर्जदारास उर्वरित दोन अर्जावर माहिती न मिळाल्याने अर्जदाराने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांचेकडे दिनांक- २२-१२-२००६ रोजी अपिल केले. सदर अपिल अर्जदाराने महाराष्ट्र माहिती अधिकारी अध्यादेश २००३ चे

कलम ११ (१) अन्वये केले आहे व त्याच बरोबर अर्जदाराने आयोगाकडे व्दितीय अपिल महाराष्ट्र अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (१) अन्वये केले आहे.

अर्जदाराने सुरुवाती पासून महाराष्ट्र माहिती अधिकार नियम २००२ अन्वये अर्ज केला असल्यामूळे व त्याच बरोबर पुढील अपिले देखील महाराष्ट्र माहिती अधिकार २००२ अन्वये केले असल्यामूळे व आता सदर कायदा माहे ऑक्टोंबर, २००५ पासून निरसीत झाला असल्यामूळे अर्जदाराच्या या अपिलावर आयोगा सुनावणी घेवू शकत नाही. असे अर्जदार यांना स्पष्ट करण्यात आले. तथापि अर्जदारास आवश्यक ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी तात्काळ पुरवावी, असेहि जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जालना यांना सूचित करण्यात आले आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात आले आहे.

औरंगाबाद, दिनांक- २२मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार नारायण बाबुराव देशमूख, मु.पो.मंगरुळ (ख.) तालूका घनसावंगी जि.जालना.
२. जनमाहिती अधिकारी तथा तालूका कृषी अधिकारी, घनसावंगी जि. जालना यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी, परतूर यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी, जालना यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
५. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
६. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/९८**
**निर्णय दिनांक २९-०३-२००७**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शे. गफार हाबीब रा. चिखली (बु.) ता. किनवट जिल्हा नांदेड | -- | अर्जदार |

## विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | तालुका कृषि अधिकारी किनवट तालुका किनवट जिल्हा नांदेड | -- | |
| २ | उपविभागीय कृषि अधिकारी किनवट तालुका किनवट जिल्हा नांदेड | -- | उत्तरवादी |

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९ मार्च,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार शेख गफार हबीब , ( येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल. ) गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी कार्यालय किनवटचे माहिती अधिकारी ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) श्री. गुणवंतराव किसनराव टारपे व अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी किनवट तालुका किनवट जिल्हा नांदेड (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) हे गैरहजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम दिनांक- २३-०८-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून खालील माहिती मागविली होती.

" सन २००५-२००६ मध्ये झालेल्या मंडळ कृषी अधिकारी इस्लापूरच्या अंतर्गत झालेल्या संपूर्ण कामांची माहिती साप्ताहीक अहवाल व प्रशासकीय मान्यतेनूसार M. B लेव्हल हजेरीपटसह माहिती देण्यात यावी."

सदर माहिती अर्जदाराने टपालाव्दारे अपेक्षिली होती. अर्जदार हे दारिद्रय रेषेखाली असून त्यांचा अनुक्रमांक (९५- चिखली बु. ) असा आहे.

सदर माहिती दिनांक- २१-०९-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक- माअ/१२२७/२००६ या क्रमांकाच्या पत्राने त्यांना दिली. कृषी खात्याचे उपस्थित प्रतिनिधी श्री. गुणवंत किशनराव टारपे, तांत्रिक कृषी अधिकारी हे आज सत्यप्रतिज्ञेवर असे विधान करीत आहेत की, कृषी खात्यामध्ये तांत्रिक कृषी अधिकारी हे जनमाहिती अधिकारी असून तालूका कृषी अधिकारी हे अपिलिय अधिकारी आहेत.

सदर प्रकरणी कृषी विभागाचे प्रतिनिधीचे म्हणणे ग्राहय धरल्यास अर्जदाराने अर्ज करतांना तो माहिती अधिका-याकडे न करता तो अपिलिय अधिकारी यांच्याकडे केलेला दिसतो. अर्जदारास माहिती अधिकार कायदा २००५ चे अमंलबजावणी संदर्भात जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकार कोण आहेत. याची कल्पना नसल्यामूळे त्यांनी प्रथम अपिल दिनांक- २५-०९-२००६ रोजी उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडे केले व त्यात त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी कायम ठेवली. तथापि अर्जदारास उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडून काहीहि माहिती प्राप्त न झाल्यामूळे अर्जदाराने व्यथीत होवून राज्य

माहिती आयोगा कडे दिनांक- ०८-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले. ( अर्जदाराच्या व्दितीय अपिलामध्ये अर्जदाराने तारखेचा उल्लेख केलेला नाही. तथापि राज्य माहिती आयोग कार्यालय, मुंबई येथून आलेल्या व्दितीय अपिलाच्या अर्जावरील शिक्का पाहिला असता त्यावर दिनांक- ०८-०२-२००७ अशी तारीख दिसून येते. )

आज झालेल्या युक्तीवादामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अज्रदारास दिनांक- २७-१२-२००६ रोजी त्यांचे पत्र क्रमांक माअ/ १७२२/२००७ रोजी अर्जदारास संपूर्ण माहिती दिल्याचे शपथपत्रादारे कबूल केले आहे. अर्जदारास सदर माहिती मिळाल्याची पोंच पावती माहिती अधिकारी यांच्याकडील असलेल्या पत्राच्या स्थळप्रतीवर अर्जदाराने सही करुन दिली आहे.

आज सुनावणीस अर्जदार गैरहजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांनी दाखविलेल्या कागदपत्रावरुन अर्जदारास माहिती मिळाल्याचे दिसून येते. यावरुन अर्जदारास या प्रकरणी पुढील माहितीची आवश्यकता नाही, असे सिध्द होते. म्हणून अर्जदाराचे व्दितीय अपिल निकाली काढण्यात येत आहे.

प्रसंगावशात येथे असे नमूद करण्यात येते की, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांनी दिनांक- १६-०९-२००५ रोजीच्या आदेशाव्दारे त्यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून काही अधिका-यांच्या नेमणूका केल्याचे दिसून येत आहे. तथापि सध्या प्रचलीत असलेला माहिती अधिकार कायदा २००५ हा ऑक्टोंबर, २००५ पासून अंमलात आला होता. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, नांदेड यांचे दिनांक- १६-०९-२००५ रोजीचे आदेश निष्प्रभ ठरतात. याची त्यांनी नोंद घ्यावी व सुधारित आदेश ( केंद्रीय माहिती अधिकार कायदा २००५ च्या संदर्भात ) प्रस्तूत करावेत. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## -निर्णय-

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद, दिनांक- २९ मार्च, २००७ ( वि.बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रति-

१. श्री.शेख गफार हबीब, राहणार- चिखली (बु.) ता.किनवट, जिल्हा- नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा तांत्रिक कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, किनवट जि.नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, किनवट, ता.किनवट.जि.नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. उपविभागीय कृषी अधिकारी, किनवट, जि.नांदेड. यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. श्री.दौंड,सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/९३**
निर्णय दिनांक- २२ मार्च, २००७.

**१.** श्री. सरदार हरजितसिंग पिता तिरथसिंग सहानी **-अपिलकर्ता.**
५-१-५५-११, उस्मानपुरा,
औरंगाबाद.

**विरुध्द.**

**१.** जनमाहिती अधिकारी तथा **- उत्तरवादी.**
नगर भूमापन अधिकारी,
जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय,
औरंगाबाद.

२. अपिलिय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद.

**-विवेचन-**

या प्रकरणाची प्रथम सुनावणी दिनांक- २० जानेवारी, २००७ रोजी ठेवण्यात आली होती. परतू सुनावणीच्या वेळेस अर्जदार गैरहजर असल्यामूळे सुनावणी घेण्यात आली नाही. पुढील तारीख २२ मार्च, २००७ ही देण्यात आली.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ मार्च,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. सरदार हजरजितसिंग पिता तिरथसिंग सहानी, (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल.), जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी, जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.वसंत सदाशिवराव निकम व अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक, भुमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.सदाशिव गणपतराव धोडेकर हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम माहिती अधिकार २००५ अन्वये २७-०१-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहितीची मागणी केली होती.

" दिनांक- ०५-०२-९४ रोजी सिटी सर्व्हे नं. १७०१६, १७०१४ शिट नं. १५३, संचिकाची सविस्तर माहिती पाहिजे. "

अर्जदाराने ही माहिती प्रत्यक्षतः अपेक्षिली होती. सदर माहितीचा कालावधी १९९४ ते २७-०१-२००६ असा अपेक्षिला आहे.

अर्जदाराच्या वरील माहितीचा मागणीवरुन अर्जदारास नक्की कोणती माहिती हवी आहे, हे स्पष्ट होत नाही.हे प्रथम स्पष्ट करणे गरजेचे आहे.

अर्जदाराच्या वरील माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिनांक- १४-०२-२००६ रोजी प्रथम उत्तर दिले. त्या उत्तरामध्ये अर्जदाराने मागणी केलेल्या माहितीची संचिका उपलबध नसल्याचे व तसेच या प्रकरणाचा शोध घेणे चालू असल्याचे कळविले आहे. त्याच बरोबर सदर प्रकरणाचा शोध घेवून ते उपलब्ध झाल्या नंतर आपणास कळविण्यात येईल. असेहि या पत्रातील उत्तरामध्ये नमूद केल्याचे दिसते. त्याच बरोबर सदरचा अर्ज तूर्त निकाली ठेवला आहे. ( याचा अर्थ सदर अर्ज नस्तीबंद केला आहे. असे अपिलिय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये स्पष्ट केले.) असे अर्जदारास पुढे कळविले आहे.

या पत्रावर समाधान न झाल्यामूळे अर्जदाराने माहिती अधिकार कायदा २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिलिय अधिकारी यांचेकडे दिनांक- २७-०२-२००६ रोजी प्रथम अपिल केले. अपिलात अर्जदाराने मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे व त्याच बरोबर जनमाहिती अधिकारी यांचेवर माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम २० (१) अन्वये कार्यवाही करण्याचे अपेक्षिले आहे.

या अपिलाची आजतागायत म्हणजे दिनांक- २२-०३-२००७ पर्यात अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी घेतलेली नाही.

अर्जदारास मूळ माहितीच्या अर्जावर व अपिलावर कोणत्याही प्रकारचा निर्णय न झाल्यामूळे व्यथीत होवून अर्जदाराने दिनांक- १०-०४-२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. व्दितीय अपिलामध्ये देखील अर्जदाराने मूळ मागणी कायम ठेवून जनमाहिती अधिकारी व जनअपिलिय अधिकारी यांचेवर कलम २० (१) प्रमाणे कार्यवाही करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आजच्या सुनावणीमध्ये अर्जदाराने त्यास हवी असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांचेकडील पत्र क्रमांक माहिती अधिकार क्र.४/ २००६, दिनांक- १२-०२-२००७ रोजीच्या पत्रा अन्वये माहिती मिळाली असल्याचे अर्जदाराने कबूल केले व या माहितीने त्यांचे समाधान झाले आहे, असेहि त्यांनी पुढे सुनावणीमध्ये कबुल केले आहे व त्याप्रमाणे त्यांनी आयोगास शपथपत्रावर लिहून दिले आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी  माहिती देण्यास कसूर केल्याचे व त्याच बरोबर अपिलिय अधिकारी यांनी अर्जदाराचे अपिल त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलाची वेळेत सुनावणी घेतली नाही, हे सिध्द होते. जनअपिलिय अधिकारी यांनी या प्रकरणी दाखविलेल्या बेजबाबदार पणा व बेफीकीर वृत्तीची नोंद सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई यांनी यथा योग्यरित्या घ्यावी. असे त्यांना सूचीत करण्यात येत आहे. त्याच बरोबर संबंधीत जनमाहिती अधिकारी यांनी या प्रकरणात अर्जदारास कोणत्याही प्रकारे माहिती देण्याची साधी तयारी देखील दर्शविली नाही, असे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. त्यांनी दाखविलेल्या बेफीकीर वर्तना बाबत जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी त्यांच्यावर यथा योग्य प्रशासकिय कार्यवाही करावी, असेहि त्यांना सूचित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद, दिनांक- २२ मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार श्री. सरदार हरजितसिंग पिता तिरथसिंग सहानी, ५-१-५५/१, उस्मानपूरा, पोस्ट ऑफिस जवळ, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा  जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख, नगर भूमापन अधिकारी क्रमांक-१, औरंगाबाद.
३. अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद.
४. सचिव (महसूल) मंत्रालय, मुंबई ३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
५. संचालक, जमाबंदी व भूमी अभिलेख कार्यालय, पूणे, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
६. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या बेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
७. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद/नाशिक**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक २००७/९९**
**निर्णय दिनांक २९-०३-२००७**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री.श्री.कृष्ण एल.देशपांडे,<br>सोनी महाल ३८<br>महावीर हाऊसींग सोसायटी, नांदेड-४३१६०२ | -- | अपिलकर्ता |

## विरुध्द

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जनमाहिती अधिकारी तथा<br>मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू जि.परभणी | -- | |
| २ | अपिलिय अधिकारी तथा<br>उपआयुक्त (सा.प्र.वि.)<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | -- | उत्तरवादी |

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९ मार्च,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री.कृष्ण एल.देशपांडे, ( येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल. ) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद, सेलू जिल्हा-परभणी ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) श्री.एस.जी.गोविंदवार व अपिलिय अधिकारी तथा उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री. मुगळीकर हे गैरहजर आहेत तथापि त्यांचे वतीने तहसीलदार, नगर प्रशासन,आयुक्त कार्यालय, औरंगाबाद श्रीमती मंजूषा मुथा हया हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम दिनांक- १९-०१-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्या कडे २००२ ते २००५ या कालावधीची खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) सेलू नगर परिषद सेलू मार्फत २००२ ते २००४ या तीन आर्थीक वर्षाच्या कालावधीत रस्ते, नाल्या व पुलांच्या बांधकामाच्या केलेल्या कामाबाबत तपशीलवार माहिती

२) सेलू नगर परिषदेकडून २००२-२००४ या तीन आर्थीक वर्षात करण्यात आलेल्या इमारती बांधकामा बाबत.

३) सेलू नगर परिषदेच्या हद्दीतील आरक्षित जमीन व सर्वे नंबर बाबत माहितीशी संबंधित कालावधी वरील तिन ही विषयांसाठीचा कालावधी तीन आर्थीक वर्षे ( १/४/२००२ ते ३१-३-२००५) माहिती वर्ष निहाय.

अर्जदाराने सदरील माहिती टपालाव्दारे अपेक्षिली आहे.

जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, सेलू यांनी या प्रकरणी अर्जदारास विहीत मुदतीत कोणतीहि माहिती दिली नाही. अधिनियमातील निर्धारीत मुदत संपल्यानंतर अर्जदाराने प्रथम अपिल अतिरीक्त जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे दिनांक- २०-०५-२००६ रोजी केले. तथापि अतिरीक्त जिल्हाधिकारी, परभणी हे या प्रकरणी अपिलिय अधिकारी नसल्याने त्यांनी हे अपिल उपआयुक्त (सा.प्र.वि.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे दिनांक- ०१ जून, २००६ रोजी प्रथम सुनावणीसाठी पाठविले.

.सदर अपिलाच्या सुनावणीवर अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- ०३-१०-२००६ रोजी निर्णय दिला. सदर निर्णयामध्ये त्यांनी अर्जदाराचे अपिल मान्य करुन अर्जदारास मुळात अपेक्षित असलेली सर्व माहिती सात दिवसाच्या आत अर्जदारास विनामुल्य पुरविण्याचे आदेश दिले. तथापि या आदेशा नंतरहि अर्जदारास कोणतीहि माहिती प्राप्त न झाल्यामूळे अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- ०५-०२-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. मध्यंतरीच्या काळात

दिनांक- ०६-०७-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी सदर माहिती तयार झाल्याचे कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी हे आज सुनावणीमध्ये सांगत आहेत व या संदर्भात त्यांनी त्यांचे कार्यालयाचे एक पत्र आयोगास सादर केले. सदर पत्र जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास पाठविले नसल्याचे ते आज सुनावणीमध्ये कबुल करतात. परंतू वरील बाब अर्जदाराच्या निदर्शनास दुरध्वनि व्दारे  आणली होती. असे आज ते सुनावणी मध्ये सांगत आहेत. त्यांच्या या विधानामूळे त्यांची कोणतीहि बाजू/ मुद्दा स्पष्ट होत नाही.

अर्जदारास निर्धारीत मुदतीत माहिती न देणे, प्रथम अपिलात निर्णय झाल्या नंतरहि अर्जदारास माहिती  मिळविण्या पासून  वंचित ठेवणे व व्दितीय अपिलाची सुनावणीमध्ये माहिती तयार असल्याचे कबूल करणे व ती एका आठवडयात देण्यांची कबुल करणे, इत्यादी सर्व प्रतिक्रिया पाहिल्या असता जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देण्यास दिरंगाई केल्याचे स्पष्ट होते. याबद्दल त्यांना आयोगा तर्फे  ताकीद देण्यात येत असून त्यांनी यापुढे अशा प्रकारचे वर्तन करु नये. अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे. त्याच बरोबर अर्जदारास त्यांनी मागणी केलेल्या मूळ माहिती स्पष्टपणे स्वच्छ स्वरुपात व अचूकरित्या विनामूल्य एक दिवसात पुरवावी, असे आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## -निर्णय-

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अर्जदारास अचूकरित्या विनामूल्य माहिती एक दिवसात पुरविण्यात यावी.

औरंगाबाद, दिनांक- २९ मार्च, २००७

( वि.बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रति-

१. श्री.श्री.कृष्ण एल.देशपांडे, सोनी महाल ३८ महावीर हाऊसींग सोसायटी, नांदेड.

२. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सेलू जि.परभणी यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.वि.) विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड,सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई-३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १४०/२००७

निर्णय दिनांक २९ मार्च २००७

१ श्री. ननवरे पी. एस. : अपीलकर्ता

रा. उस्मानाबाद

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक :

शम्सुल उलुम उर्दु हायस्कुल, उस्मानाबाद

२ अपीलीय अधिकारी तथा सचिव शम्सुल : उत्तरवादी

एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद

विवेचन

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००७ रोजी ठेवण्यात आली होती. तथापि जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यापैकी कोणीही हजर नाही.

या प्रकरणी अर्जदार श्री. पी. एस. ननवरे यांनी सर्व प्रथम दिनांक २८-११-२००६ रोजी माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शम्सुल उलुम उर्दु हायस्कुल यांच्याकडून स १९९७ ते २८-११-२००६ पर्यतच्या कालावधीतील खालील माहिती मागविली होती.

१ सन १९९७ ते मार्च २००६ पर्यतच्या आपल्या शाळेचे शिक्षण विभाग जिल्हा परिषद उस्मानाबाद व पंचायत समिती उस्मानाबाद यांच्याकडून तपासणी झालेल्या वार्षिक तपासणी अहवालाच्या सत्यप्रती मिळणेबाबत.

२ सन १९९७ ते नोव्हेंबर २००६ पर्यतच्या शिक्षक हजेरी पत्रकातील शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या स्वाक्ष-या असलेल्या शिक्षक हजेरीच्या सत्यप्रती मिळणेबाबत.

सदर माहिती अर्जदाराने टपालाव्दारे मागविली होती व माहितीचा कालावधी १९९७ ते नोव्हेंबर २००६ असा अपेक्षिला होता.

वरील अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००६ रोजी उत्तर देऊन त्यामध्ये जन माहिती अधिका-यास त्यांच्या पुर्वीच्या मुख्यध्यापकाने कोणत्याही प्रकारचा कार्यभार हस्तांतरीत न केल्यामुळे माहिती देण्यास असमर्थता व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अर्जदाराने या संस्थेचे जन अपीलीय अधिका-याकडे दिनांक २७-१२-२००६ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि या अपीलावर कोणतीही सुनावणी न झाल्यामुळे अर्जदाराने व्यथित होऊन दिनांक २७-०१-२००७ रोजी राज्य माहिती आयुक्तांकडे व्दितीय अपील दाखल केले.

या व्दितीय अपीलामध्ये अर्जदाराने आपली मुळ अर्जातील मागणी कायम ठेवली आहे.

आज दिनांक २९-०३-२००७ रोजी मुख्याध्यापक शम्सुल उलुम उर्दु हायस्कुल उस्मानाबाद यांनी लेखी पत्राव्दारे राज्य माहिती आयोगाच्या असे निदर्शनास आणले आहे की अर्जदार श्री. ननवरे पी. एस. यांना त्यांनी मागितलेली सर्व माहिती दिनांक १६-०२-२००७ रोजी सचिव शम्सुल एज्युकेशन सोसायटी उस्मानाबाद यांनी सुपुर्द केली आहे व याबाबत अर्जदाराची कोणतीही तक्रार आता उरलेली नाही. याच बरोबर अर्जदार श्री. ननवरे पी. एस. यांना दिनांक १६-०२-२००७ रोजी सदर माहिती मिळाल्याची पोच पावती त्यांनी जोडली आहे.

उपलब्ध कागदपत्रावरुन व अर्जदाराच्या अनुपस्थितीवरुन अपीलाबाबत अर्जदाराची आता कोणतीही तक्रार उरलेली नसल्याचे दिसते. सबब सदर अपील निकाली काढण्यात येत आहे.

## निर्णय

अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २९ मार्च २००७

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ अर्जदार श्री. ननवरे पी. एस. योगेश निवास, बी. फॉर्मसी कॉलेज जवळ बार्शी रोड उस्मानाबाद

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक शम्सुल उलुम उर्दु हायस्कुल, उस्मानाबाद

३ अपीलीय अधिकारी तथा सचिव शम्सुल एज्युकेशन सोसायटी, उस्मानाबाद

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ३ ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक १०२/२००७

निर्णय दिनांक २९ मार्च २००७

१ श्री. भास्कर आण्णा वाघमारे गुरुछाया निवास, संत नामदेवनगर (पुर्व) सांस्कृतिक सभागृहा शेजारी, धानोरा रोड, बीड : अपीलकर्ता

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड :

२ अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, प्रशासन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड : उत्तरवादी

<u>विवेचन</u>

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक २९-०३-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. भास्कर आण्णा वाघमारे (यापुढे अर्जदार म्हणून संबोधण्यात येईल) हे स्वतः हजर होते. माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बीड श्री. डी. ई. जाधव (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल) व अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र विकास प्राधिकरण बीड श्री. दि. द. तवार (यापुढे जन अपीलीय अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल) हे हजर होते.

या प्रकरणी अर्जदार श्री. भास्कर आण्णा वाघमारे यांनी प्रथमतः दिनांक २१-०१-२००६ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील माहिती मागितली होती.

१ प्राधिकरण कार्यालय बीड येथील अशोक वसंतराव कुलकर्णी (वरिष्ठ लिपीक) हे गेल्या

पंधरा वर्षापासून बीड मुख्यालयास कार्यरत आहेत. संबंधिताची बदली जिल्ह्याबाहेर झाली असतांना देखील श्री. अशोक वसंतराव कुलकर्णी यांना प्राधिकरण कार्यालयात आस्थापना बीड शाखेतच का ठेवण्यात आले याबाबतची माहिती अवगत करावी. त्यांच्या बदलीस स्थगिती देण्याबाबतच्या पत्रव्यवहाराच्या नकला देण्यात याव्यात.

सदर माहिती अर्जदाराने व्यक्तीशः अपेक्षिली होती. अर्जदाराने माहिती अर्जामध्ये माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही.

अर्जदाराच्या या पत्रावर जन माहिती अधिकारी यांनी २० फेब्रुवारी २००६ रोजी अर्जदारास आवश्यक ती माहिती पुरविली असल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि या उत्तरावर समाधान न झाल्यामुळे अर्जदाराने दिनांक ०६-०३-२००६ रोजी जन अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील केले. सदर अपील करण्याचे कारण त्यांनी मागितलेली माहिती न मिळाल्यामुळे असे दिले आहे. याच बरोबर अर्जदाराने श्री. अशोक वसंतराव कुलकर्णी यांची लातूर, उस्मानाबाद येथील बदली संदर्भातील आदेशाच्या प्रतीची जादा मागणी केली आहे. श्री. अशोक वसंतराव कुलकर्णी हे गेल्या १८ वर्षापासून बीड येथील आस्थापना शाखेत कार्यरत आहेत यावरच अर्जदाराचा मुख्य आक्षेप आहे.

अर्जदाराच्या या अपीलावर अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०३-२००६ रोजी सुनावणी घेतली. अपीलीय अधिका-याने सुनावणीचा निर्णय विहित नमुन्यात न देता अर्जदारास त्यांचेकडील पत्र क्रमांक २३२४ दिनांक ०३ एप्रिल २००६ रोजी पत्राव्दारे जादा माहिती पुरविली आहे. अपीलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची असून त्यांनी दोन्ही बाजुंचे म्हणणे ऐकून व ते रेकॉर्ड करुन त्यावर निर्णय द्यावयास पाहिजे तथापि अपीलीय अधिका-याने तसे केल्याचे दिसून येत नाही. परंतु अर्जदारास जादा माहिती पुरविल्यासे दिसते.

अर्जदाराचे या माहितीवर समाधान न झाल्यामुळे व्यथित होऊन अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०४-२००६ रोजी व्दितीय अपील केले आहे. अर्जदाराचे व्दितीय अपील केल्यापासून ते सुनावणीच्या तारखेपर्यतच्या मध्यंतरीच्या काळात दिनांक ११-०१-२००७ रोजी

माहिती आयुक्तांना उद्देशून एक पत्र दिले आहे व या पत्रामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी व जन अपीलीय अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केल्यामुळे माझे समाधान झाले आहे व माझी काही तक्रार राहिली नाही असे लेखी कळविले आहे. सदर पत्र त्यांनी लिहिले आहे हे ते आज सुनावणीमध्ये मान्य करत आहे व याच बरोबर त्यांनी शपथपत्रावर कबुली दिली आहे. अर्जदाराला आवश्यक असलेली माहिती मिळाल्यामुळे व अर्जदाराची आता कोणतीही तक्रार नसल्यामुळे सदर अपील आता निकाली काढण्यात येत आहे.

सबब खालील प्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद
दिनांक २९ मार्च २००७

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भास्कर आण्णा वाघमारे गुरुछाया निवास, संत नामदेवनगर (पुर्व) सांस्कृतिक सभागृहा शेजारी, धानोरा रोड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड

३ अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, प्रशासन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

अपील क्रमांक ६३/२००७

निर्णय दिनांक ३० मार्च २००७

१ श्री. जिवनराव रामराव उबाळे, ज्ञानेश्वरनगर, : अपीलकर्ता
आय. टी. आय. च्या पाठीमागे, नगर रोड, बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार :
(महसूल) तहसील कार्यालय बीड

२ अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार बीड : उत्तरवादी

**विवेचन**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ३०-०३-२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. जिवनराव रामराव उबाळे (यापुढे अर्जदार म्हणून संबोधण्यात येईल) बीड, जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) (यापुढे जन माहिती अधिकारी म्हणून संबोधण्यात येईल) बीड हे उपस्थित होते. तर अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार बीड हे गैरहजर होते. आर्थिक वर्ष २००६-०७ या आर्थिक वर्षाचा आजचा शेवटचा दिवस असल्यामुळे व तहसीलदार आंहरण व वितरण अधिकारी असल्यामुळे त्यांना मुख्यालयी हजर असणे आवश्यक असल्याचे त्यांनी आयुक्तांकडे पत्र सादर केले आहे. सदर प्रकरणी त्यांना अनुपस्थित राहण्याची परवानगी एक अपवादात्मक बाब म्हणून देण्यात येत आहे. यापुढे आयोगाच्या तारखांना त्यांनी स्वतः न चुकता हजर राहावे अशी त्यांना सूचना देण्यात येत आहे.

या प्रकरणी अर्जदार यांनी जन माहिती अधिकारी तहसीलदार कार्यालय बीड यांचेकडे दिनांक १३-०९-२००६ रोजी प्रथम अर्ज करुन खालील माहिती मागितली होती.

१ टी. बी. कुंभार यांच्या नावाच्या फेरफार संचिकेची झेरॉक्स

२ सोसायटी जमिनीतील किती फेरफार घेण्यात आले आहे त्यासंबंधी माहिती

३ वाटणीपत्राच्या आधारे किती ?

४ खरेदीखता आधारे किती फेरफार घेण्यात आले आहे

५ टी. बी. कुंभार यांच्या नावावर प्लॉट क्षेत्र ११० चौरस मिटर नोंद ७/१२ वर आहे का

६ ओपन स्पेस व रस्ते नोंद ७/१२ वर घेतली आहे काय

७ सध्या टी. बी. कुंभार यांच्या नावावर किती जमीन शिल्लक आहे

८ ८ अ चा उतारा २००६ देण्यात यावा

९ फेरफार क्रमांक, तारीख, लाभधारकांची नावासह यादी देण्यात यावी.

सदर माहिती अर्जदाराने व्यक्तीशः अपेक्षिली होती. अर्जदाराने माहिती अर्जामध्ये माहितीचा कालावधी नमूद केलेला नाही.

अर्जदाराने मागितलेल्या या माहितीवर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना सर्व प्रथम दिनांक १६-११-२००६ रोजी अर्जदारास प्रती पृष्ठ दहा रुपये या दराने दोन पृष्ठाचे माहितीकरिता वीस रुपये शासकीय कोषागारात भरण्याची विनंती केली. अर्जदाराने माहिती अधिकार कायद्या खाली अर्ज केल्यानंतर अर्जदारास संबंधित माहिती देण्याकरिता लागणारे शुल्क त्यांना माहिती अधिकारी यांनी एक महिन्याच्या आत कळविणे आवश्यक होते तथापि या प्रकरणात विहित मुदत टळून गेल्यानंतर अंदाजे ३४ दिवस इतक्या उशीराने अर्जदारास वीस रुपये शासकीय कोषागारात भरावयास लावण्याची विनंती करणारे पत्र पाठविणे ही जन माहिती अधिकारी यांच्याकडून झालेली चूक आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीच माहिती प्राप्त न झाल्याने अर्जदाराने माहिती अधिकार कायद्यान्वये जन अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ३०-१०-२००६ रोजी प्रथम अपील

केले. सदर अपीलाची सुनावणी जन अपीलीय अधिकारी यांनी आजतागायत घेतलेली नाही ही बाब आज उपस्थित असलेले जन माहिती अधिकारी कबूल करतात.

जन माहिती अधिका-याने विहित मुदतीत माहिती दिली नाही, प्रथम अपीलीय अधिका-याने अपीलाची सुनावण घेतली नाही म्हणून व्यथित होवून अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०१-२००७ रोजी सरळ व्दितीय अपील केले आहे. या अपीलामध्ये त्यांनी अपली मूळ मागणी कायम ठेवली आहे.

आज रोजी झालेल्या सुनावणीमध्ये अर्जदाराने मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांनी मागितलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची आहे हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांच्या मूळ अर्जातील प्रत्येक मुद्दयावर आज सुनावणीमध्ये चर्चा झाली. संबंधित मुद्दयावरील जन माहिती अधिका-याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती सर्व माहिती अर्जदारास देण्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे कबूल केले. ही माहिती अर्जदारास दिनांक ०२ एप्रिल २००७ रोजी रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्याचे त्यांनी पूढे कबूल केले आहे त्याप्रमाणे ती देण्यात यावी त्याच बरोबर सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणा संदर्भात अर्जदारास अधिक माहितीची आवश्यक असेल तर अर्जदाराने त्याप्रमाणे लेखी विनंती केल्यानंतर माहिती कायदा २००५ मधील तरतुदीनुसार अर्जदारास या प्रकरणातील सर्व नस्त्या पाहणीकरिता तात्काळ उपलब्ध करुन देण्यात याव्या असे आदेशित करण्यात येत आहे.

सदर प्रकरण हे प्रेरणा गृहनिर्माण सहकारी संस्था मर्यादित या तत्कालीन सहकारी संस्था संदर्भातील असून या संस्थेचे मुख्य प्रवर्तक १९९१ ते २००० पर्यत श्री. टी. बी. कुंभार हे होते. सोसायटीच्या नावे खरेदी केलेल्या जमिनीचे क्षेत्र ८१ आर इतके होते. या क्षेत्राचे १९ प्लॉट पाडून सर्व सभासदांना या प्लॉटची वाटणी करण्यात आली. अहवालात संस्थेच्या भुखंडावर एकूण चार प्लॉट ओपन स्पेसेस म्हणून दाखविले आहेत. काही कालावधीनंतर सदर सहकारी गृहनिर्माण संस्था सर्व सभासदांनी ठराव करुन बराखास्त केली. तदनंतर संस्थेचे मुख्य प्रवर्तक टी. बी. कुंभार यांनी चार ओपन स्पेस म्हणून दाखविलेल्या प्लॉटपैकी दोन प्लॉटची विक्री केली ही विक्री

बेकायदेशीर असल्याने व या प्रकरणात अपराध्यांना शासन होण्याच्या दृष्टीने अर्जदार प्रयत्नशील आहेत. सोसायटीच्या एकूण क्षेत्रामधून वेळोवेळी विक्री झालेल्या भूखंडाच्या क्षेत्राची वजावट न करता तत्कालीन तलाठी व दुय्यम निबंधक मुद्रांक यांनी संगनमताने हा गैरव्यवहार केल्याचे आज सुनावणीमध्ये अर्जदार यांनी सांगितले. या प्रकरणाची भ्रष्टाचार निर्मुलन समिती समोर तक्रार करुन देखील, गैरव्यवहार करणा-या कर्मचा-यावर अद्यापही काहीही कारवाई महसूल विभागातर्फे झालेली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे तेव्हा या प्रकरणी जिल्हाधिकारी बीड यांनी स्वतः लक्ष घालून याची चौकशी करावी व सर्व दोषी अधिकारी / कर्मचारी यांचेवर यथायोग्य कारवाई करावी व त्याचा अहवाल आयोगास तीन महिन्याच्या आत पाठवावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

या प्रकरणाची प्रथम सुनावणी दिनांक ०९ मार्च २००७ रोजी ठेवण्यात आली होती त्यावेळी अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार बीड हे गैरहजर होते त्यामुळे व्दितीय सुनावणी दिनांक ३०-०३-२०० रोजी ठेवण्यात आली. अर्जदाराने व्दितीय सुनावणीच्या वेळेस प्रथम सुनावणीचा निष्कारण भुर्दड पडला म्हणून त्यांनी बीड ते औरंगाबाद व औरंगाबाद ते बीड या प्रवासखर्चाची मागणी केली आहे ती मंजूर करण्यात येत असून त्यांना सदरील रक्कम तहसीलदार बीड यांनी अदा करावी असे आदेशित करण्यात येत आहे.

## आदेश

अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ३० मार्च २००७ ( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जिवनराव रामराव उबाळे, ज्ञानेश्वरनगर, आय. टी. आय. च्या पाठीमागे, नगर रोड, बीड

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल) तहसील कार्यालय बीड

३ अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार बीड

४ श्री. दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईट वर प्रसिध्द करण्यासाठी.

५ जिल्हाधिकारी बीड यांनी निकालपत्रातील त्यांना दिलेल्या आदेशाची नोंद घेऊन अनुपालन अहवाल पाठविण्यासंदर्भात.

६ निर्णय नस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-**२००७/ ६०
निर्णय दिनांक- ०८ मार्च, २००७.

१. शेख फैसल म. इकबाल मुजावर
न्यु मेडिकल क्वार्टस वार्ड क्र. ३ व ४ च्या
मागे I-१-२-घाटी हॉस्पीटल औरंगाबाद. **-- अपिलकर्ता.**

विरुध्द

**१.** जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार, औरंगाबाद. **--उत्तरवादी.**

२. अपिलिय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,औरंगाबाद.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- ०८-०३-२००७ रोजी औरंगाबाद येथे आयोगा समोर करण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. शेख फैसल म. इकबाल मुजावर,(येथून पुढे अर्जदार असा उल्लेख करण्यात येईल.) जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार,औरंगाबाद, श्रीमती अर्पणा सोमानी (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असा उल्लेख करण्यात येईल.) व अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद श्री.अे.एम. शिंदे (येथून पुढे अपिलिय अधिकारी असा उल्लेख करण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी प्रथम अर्जदार यांनी दिनांक- २७-०१-२००६ रोजी तहसीलदार औरंगाबाद यांच्याकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतूदीनूसार खालील माहिती मागविण्या करिता अर्ज केला होता.

" बिबिका मकबरा राबिया दुर्रानी च्या संबंधित असलेली रक्कम मिळकती औरंगाबाद संबंधित सर्व्हे नं. १६७,१६८,१६९,१४८,१४९,१७०,१७१,१७२,१७४, ३४७/१००, ३४८/१०१ यांची इ.स. १९५१ ते २३००५ पर्यंत चे सातबारा

२) खासरा पत्रक (३) पाहणी पत्रक ,फेरफार (४)इनामपत्रक (५) मुतखंब (६) अवार्ड (७) नमूना नंबर याची झेरॉक्स प्रत देण्यात यावी.

वरीलप्रमाणे मिळकतीची संपूर्ण अभिलेख कागदपत्राची संपूर्ण माहिती देवून प्रत द्यावी.

जर पुरातत्व विभागाने संपादित केली असेल तर त्याचा मोबदला कोणाला दिला व केंव्हा व कधी दिला? "

अर्जदाराने सदर अर्जात ही माहिती त्यांना पोष्टाने पाहिजे किंवा व्यक्तिशः पाहिजे किंवा कसे याचा उल्लेख केला नाही.

अर्जदाराच्या या अर्जावरुन संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक- २००६/ भूसूधार/कावी/१३६, दिनांक- २०-०२-२००६ अन्वये सदरचे रेकॉड अभिलेख विभाग तहसील कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामूळे आपण मागणी केलेले कागदपत्रा बाबत माहिती देणे शक्य नाही. म्हणून आपला अर्ज निकाली काढण्यात आला आहे. असे कळविले.

माहिती अधिका-याच्या या उत्तराने समाधन न झाल्यामूळे अर्जदाराने दिनांक- २६-०७-२००६ रोजी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे अपिल केले. या अपिलामध्ये त्यांनी त्यांची मूळ मागणी कायम ठेवली आहे.

याच बरोबर संबंधित अर्जदाराने जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे तहसील कार्यालयातील अधिका-यांनी मला मागणी केलेल्या माहिती हि चुकीची देऊन माझी दिशाभूल करण्यात आली आहे. त्यामूळे माझा शारीरिक व मानसिक छळ झाला आहे. म्हणून खोटी माहिती देणा-या विरुध्द कार्यवाही करावी, असे दिनांक- २२-०५-२००६ रोजी अपिल केले होते.

सदर अपिल जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना प्राप्त झाल्या नंतर त्यांनी दोन्हीहि अपिल अर्ज त्यांचे पत्र क्रमांक- २००६/साशा/माअ/कावि/८५८, दिनाक ३१-०७-२००६ च्या पत्रा अन्वये उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडे ते सक्षम अपिलिय प्राधिकारी असल्यामूळे पाठविले. यावर अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २१-०८-२००६ रोजी सुनावणी घेवून निर्णय दिला आहे.

सदर निर्णयामध्ये या प्रकरणात मागणी केलेली कागदपत्रे अभिलेख कक्षातील असल्याचे स्पष्ट होते. म्हणून अर्जदारास आठ दिवसात अभिलेख कक्षातून माहिती व कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. याबाबत अपर तहसीलदार भुसूधार औरगाबाद यांनी तात्काळ आवश्यक ती कार्यवाही करावी, असे आदेशीत केले.

अपिलावर दिलेल्या या निर्णयावर ही जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीहि कार्यवाही केली नाही व प्रथम अर्जदारास माहिती मिळण्या पासून वंचीत राहावे लागले. म्हणून अर्जदाराने व्यथीत होवून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १९-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले.

अर्जदाराने व्दितीय अपिलाचे कारण चुकीची माहिती देवून " शारीरीक व मानसिक छळ " असे दिले आहे.

आज सुनावणीमध्ये उपविभागीय अधिकारी औरंगाबाद यांनी असे सांगितले की, औरंगाबाद शहर हे एकूण २२ गावांचे मिळून वसलेले आहे. प्रत्येक गावात वेगवेगळे सर्व्हेनंबर असल्यामूळे या सर्व्हेनंबरची ठिकठिकाणी पुनरावृत्ती होत आहे.

तत्वतच तहसीलदार, औरंगाबाद यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदाराने त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जात बेगमपूरा अशा गावाचे नाव दिले आहे. तथापि या नावाचे गाव अस्तित्वात नाही. त्यामूळे अर्जदाराना जनमाहिती अधिकारी माहिती देवू शकले नाही.

अर्जदाराने जरी गावाचे नाव विशीष्टपणे निर्देशित केले नसले तरी या प्रकरणी त्यांना अर्जदारास प्रत्यक्ष कार्यालयात बोलावून जागेचे वर्णन विचारले असते तर अर्जदाराने जागेचे वर्णन करुन ही माहिती प्राप्त करुन घेण्या करिता त्यांना काही मदत केली असती ही शक्यता या प्रकरणी नाकारता येत नाही. तथापि माहिती अधिका-याने स्वतः होवून माहिती देण्याकरिता या प्रकरणामध्ये स्वयं प्रेरितेच्या वृत्ती दर्शविली नसल्याचे उपलबध असलेल्या कागदपत्रावरुन व पुराव्यावरुन स्पष्ट होते.

दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकल्या नंतर व उपलब्ध कागदपत्राची छाननी केल्या नंतर अर्जदारास ज्या ठिकाणचा सर्व्हेनंबर अथवा तत्सम स्वरुपाची माहिती महसूल विभागातील अधिका-याकडून अपेक्षित आहे. त्या सर्व ठिकाणी - त्याच्या सीमा अर्जदाराने स्वतः तहसीलदार, औरंगाबाद व संबंधित भूमापन अधिकारी यांना दाखवाव्यात तदनंतरा त्या जागेचा नकाशा तयार करावा व तदनंतर या नकाशा मध्ये निश्चीत कोणते गाव व कोणते सर्व्हेनंबर येतात. या भूखंडाचे मूळ मालक कोण व त्यामध्ये कसा कसा बदल होत गेला. हे महसूल अभिलेखावरुन तपासावी.

या सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यास, सद्यस्थितीत ४० दिवसाचा कालावधी लागेल. असे उपविभागीय अधिकारी, औरंगाबाद यांनी सुनावणीमध्ये कबूल केले. तेंव्हा अर्जदारास आवश्यक असलेली त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती वरील पध्दत अवलंबवून त्यांना ४० दिवसात तहसीलदार, औरंगाबाद यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अर्जदाराने मागितलेल्या माहितीमध्ये पुरातत्व विभागाने भूसंपादन केलेल्या जागे संदर्भातील माहिती अर्जदाराने पुरातत्व विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी. या कामी महसूल यंत्रणे व तहसीलदार, औरंगाबाद यांनी अर्जदारास संपूर्णपणे सहकार्य करावे व अर्जदारास आवश्यक असलेली माहिती द्यावी. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अर्जदारास आवश्यक असलेली त्यांनी मूळ अर्जात मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना ४० दिवसात तहसीलदार, औरंगाबाद यांनी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद, दिनांक- ०८ मार्च, २००७ **( वि.बा.बोरगे )**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. श्री.शेख फैसल म.इकबाल मुजावर, रा.न्यु.मेडीकल क्वॉर्टर, वार्ड क्र.३ व ४ च्या पाठीमागे बिल्डींग नं. आय १-२, घाटी हॉस्पीटल औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-**२००७/ ६२
निर्णय दिनांक- ०९ मार्च, २००७.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजेश गणेशलाल राठोर<br>हनुमान टेकडी, जुना मोंढा,नांदेड. | **-- अपिलकर्ता.** |
| | विरुध्द | |
| **१.** | जनमाहिती अधिकारी तथा<br>प्रशासक, सिडको, नांदेड. | **--उत्तरवादी.** |
| २. | अपिलिय अधिकारी तथा<br>मुख्य प्रशासक,सिडको,औरंगाबाद. | |

## -विवेचन-

या प्रकरणाची प्रथम सुनावणी दिनांक- ०१ मार्च, २००७ रोजी ठेवण्यात आली होती. तथापि सुनावणीच्या वेळेस अपिलार्थी व मुख्य प्रशासक, सिडको, औरगाबाद हे गैरहजर असल्यामूळे त्या दिवशी या प्रकरणाची सुनावणी होवू शकली नाही.

आज दिनांक- ०९-०३-२००७ रोजी औरंगाबाद येथे आयोगा समोर व्दितीय सुनावणी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. राजेश गणेशलाल राठोर,(येथून पुढे अर्जदार असा उल्लेख करण्यात येईल.) जनमाहिती अधिकारी तथा प्रशासक, सिडको, नांदेड, श्री.राठोड जे.एल (येथून पुढे जनमाहिती अधिकारी असा उल्लेख करण्यात येईल.) व अपिलिय अधिकारी तथा

मुख्यप्रशासक,सिडको  औरंगाबाद श्री.वसंत साळुंके (येथून पुढे अपिलिय अधिकारी असा उल्लेख करण्यात येईल.) हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अर्जदाराने जनमाहिती अधिकारी, सिडको, नांदेड यांच्याकडे दिनांक- ११-०९-२००६ रोजी खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" अर्जदाराने एन.डी. योजनेतील घर क्र. एच-१७/१ घरा बाबत  मूळ मालकाशी  व्यवहार पूर्ण करुन फेरफारासाठी अर्ज प्रस्तूत केला आहे. नियमानूसार अद्याप कार्यवाही  पूर्ण नाही. म्हणून विषयानूसार माहिती मिळणे. "

अर्जदारास जुलै, २००६ या महिन्यातील नाव फेरफारा संबंधी कागदपत्राची माहिती अपेक्षित असल्याचे त्यांचे अर्जावरुन दिसून येते. अर्जदाराने ही माहिती व्यक्तीशः अपेक्षिली होती. अर्जदाराचा दिनांक- ११-०९-२००६ च्या अर्जा संदर्भात  प्रशासक, सिडको, नांदेड यांनी त्यांचे ०४-१०-२००६/१०-१०-२००६ च्या पत्रान्वये त्यांना खालील प्रमाणे उत्तरे दिली

" आपल्या हस्तांतरण प्रकरणाच्या संचिकेतील बांधकाम विभागाच्या अहवालीसाठी आपला प्रस्ताव दि. १८/०७/२००६ रोजी पाठविण्यांत आलेला होता. परंतु सिडकोचे विशेष नियोजन प्रधिकरणाचे अधिकार दिनांक १७/०६/२००६ पासुन नांदेड वाघाळा महानगर पालीकेकडे हस्तांतरीत झाल्यामुळे बांधकाम अहवालीसाठी लागणारे ना हरकत प्रमाणपत्र त्यांच्याकडुन आमच्या कार्यालयात सादर करण्यात आलेल्या तारखेपासुन व मुळ मालकाच्या सहया वैगेरे झाल्यानंतर ( जे नंतर होईल त्यानंतर) १५ दिवसांच्या आत आपले प्रकरण निकाली काढण्यात येईल."

तथापि या उत्तराने समाधान न झाल्यामूळे अर्जदाराने या निर्णयाविरुध्द जनमाहिती अधिकारी यांचेकडेच प्रथम अपिल दिनांक- ०२-११-२००६ रोजी केले. ते दिनांक- ०७-११-२००६ रोजी सिडको, नांदेड यांचेकडे  प्राप्त झाले आहे.

वास्तविक अर्जदाराने जनमाहिती अधिकारी यांच्या निर्णयावर  अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासक, सिडको, औरंगाबाद यांच्याकडे प्रथम अपिल करावयास पाहिजे होते. परंतू

अर्जदाराने तसे केल्याचे दिसत नाही. अर्जदाराची ही कृती चुकीची आहे. तथापि अर्जदारास मदत करण्याच्या दृष्टीने जनमाहिती अधिकारी यांनी हया अपिलाची सुनावणीसाठी अर्जदारास दिनांक- २४-११-२००६ रोजी पत्र लिहून त्यांना दिनांक- ०७-१२-२००६ रोजी दुपारी २.३० वाजता त्यांच्या कार्यालयात हजर राहण्या विषयी सूचीत केले. तथापि अपिलार्थी हे प्रथम सुनावणीच्या वेळी हजर राहू शकले नाही. त्या नंतर परत दिनांक- ०७-०२-२००७ रोजी त्यांना पत्र पाठवून देखील दिनांक- ०९-०२-२००७ रोजी सुनावणीसाठी कार्यालयात उपस्थित राहण्यासाठी त्यांना पत्र देण्यात आले. परंतू हयाहि वेळी अर्जदार अनुपस्थित राहिले होते.

या अपिलावर प्रशासक, सिडको, नांदेड यांनी काहीही निर्णय दिला नाही. तथापि अर्जदारास मदत करण्याच्या दृष्टीने त्यांनी दिनांक- २१-११-२००६ रोजी सहायक आयुक्त, विभाग क्रमांक-५ नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड यांच्याकडे अर्जदारास त्यांनी केलेल्या बांधकामाची परवानगी देणे संबंधी शिफारस केल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. यावरुन सिडको प्रशासनानी अर्जदारास वेळेवेळी माहिती पुरविल्याचे किंवा मदत केल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत आहे.

तथापि अपिलार्थीने प्रथम अपिलाची सुनावणीस हजर न राहता आयोगा कडे थेट दुसरे अपिल दिनांक- ०२-०१-२००७ रोजी दाखल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीहि माहिती प्राप्त झाली नाही व माहिती अधिकारी यांनी या प्रकरणात चुकीची व दिशाभूल करणारी माहिती देवून या प्रकरणी गुंतागुंत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे, असा आरोप ठेवला व त्यांनी व्दितीय अपिलामध्ये त्यांनी मूळ अर्जात केलेली माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये संदर्भीय मालमत्ता मूळतः (एनडी-४२/ एच / १७०१) श्री. मानिकसा नरसोबा कठारे यांचे मालकीची असून त्यांनी दिनांक- १७-०७-२००६ रोजी हे घर अर्जदाराचे नावाने हस्तांतरण करणे बाबत अर्ज सादर केला होता. सिडको प्राधिकरणामध्ये अशा प्रकारची हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण करतांना संदर्भीय मालमत्तेत मंजूरीपेक्षा वाढीव बांधकाम झाले

आहे किंवा कसे, या बाबत खातरजमा करुन घेण्याची पध्दत आहे. व ही पध्दत विना परवानगी बांधकामे नियमित करण्याच्या दृष्टीने योग्यही आहे. विनापरवानगी बांधकाम झाले असेल तर सदर बांधकाम नियमानुकूल करुन तदनंतर हस्तांतर प्रक्रिया पूर्ण केली जाते. विषयाकिंत घराची पहाणी सिडको कार्यालयाने केल्यानंतर सदरील घराच्या भविष्यकालीन विस्ताराचे आरसीसीचे पक्के बांधकाम झाल्याचे आढळले. सदर वाढीव बांधकामाच्या परवानगी बाबत चौकशी केली असता या बांधकामाला सिडकोची परवानगी नसल्याचे निष्पन्न झाले. याच काळात सिडकोच्या विशेष नियोजनाच्या प्रक्रियेचे अधिकार दिनांक- १७-०२-२००६ रोजी नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड यांचेकडे हस्तांतरीत झाल्यामूळे या बांधकामाच्या परवानगी संदर्भात प्रशासक,सिडको नांदेड यांनी त्यांचेकडील दिनांक- २१-११-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड यांना आवश्यक ती विनंती केली व त्याच बरोबर सिडकोचे वाढीव बांधकामा संदर्भात ना हरकत प्रमाणपत्र जोडले आहे.

त्यानंतर या घराचे मालकी हस्तांतरणाची प्रक्रिया संबधात, अर्जदारास माहिती अधिका-याने, माहिती पुरविल्याचे संचिकेतील कागदपत्रावरुन स्पष्ट दिसून येते.

या प्रकरणामध्ये सिडको कार्यालयाने नियमानूसार अशी हस्तांतरण प्रक्रियाची कार्यवाही करणे अपेक्षित आहे ती पूर्ण केली आहे व या पुढील कार्यवाही नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड यांच्या मार्फत करणे अपेक्षित आहे. असे अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीमध्ये सांगितले.

उपरोक्त कागदपत्राचे अवलोकन करता सिडको कार्यालयाने त्यांची कार्यवाही पार पाडल्याचे दिसते. या पुढील कार्यवाही नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड यांच्याकडून पार पडणे अपेक्षित असल्याने अर्जदाराने पुढील कार्यवाहीसाठी नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड यांचे कार्यालयाशी संपर्क साधून त्यांच्याकडून बांधकाम परवानगी प्राप्त करुन घ्यावी म्हणजे हस्तांतरण प्रक्रिया त्वरीत पूर्ण होण्यास मदत होईल. अर्जदाराने नांदेड महानगर पालिका नांदेड यांच्याकडे रितसर बांधकाम परवानगी प्राप्त करुन घेतल्या नंतर सदर हस्तांतरण प्रक्रिया पंधरा दिवसात पूर्ण होवू शकेल. असे जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

अर्जदाराने ही हस्तांतरण प्रक्रिया पुर्ण करण्याकरिता नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेड यांचेकडे त्यांनी प्रयत्न केला किंवा कसे याची माहिती अर्जदार दोनदा सुनावणीच्या वेळी गैरहजर असल्यामूळे माहिती मिळू शकली नाही.

हस्तांतरण प्रक्रियामध्ये दोन संस्थेचा समावेश आहे. पैकी एका संस्थेने त्यांचे काम पूर्ण केले आहे व दुस-या संस्थेकडे या प्रकरणाची काय सद्यस्थिती आहे. याची अर्जदार गैरहजर असल्यामूळे माहिती होवू शकली नाही.

सबब अशा परिस्थितीत आता या टप्प्यावर सिडकोने काहीही कार्यवाही करणे अपेक्षित नसल्याने अपिलार्थीचे दुसरे अपिल फेटाळण्यावाचून गत्यंतर नाही. असे माझे मत झाले आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

**<u>निर्णय</u>**

१. अपिलार्थीचे अपिल फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद, दिनांक- ०९ मार्च, २००७ **( वि.बा.बोरगे )**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**<u>प्रत-</u>**

१. श्री.राजेश गणेशलाल राठोर, हनुमान टेकडी, जूना मोंढा, नांदेड- ४३१६०४.
२. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासक, सिडको, नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. अपिलिय अधिकारी तथा मुख्य प्रशासक, सिडको, औरंगाबाद, यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. श्री.दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-**२००७/७३
निर्णय दिनांक- १५ मार्च, २००७.

१. कुंडलिक बापूराव डव्हारे **--अपिलकर्ता**
मु.वलखेड, पो.परतूर
तालूका-परतूर, जिल्हा- जालना.

विरुध्द

**१.** जन माहिती अधिकारी तथा **-- उत्तरवादी.**
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामद्योग मंडळ,
मुंबई.

२. अपिलिय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामद्योग मंडळ,
मुंबई.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १५ मार्च, २००७ रोजी औरंगाबाद येथे ठेवण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. कुडंलिक बापूराव डव्हारे ( येथून पुढे अर्जदार असे संबोधले जाईल.) जनमाहिती अधिकारी तथा उप-मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई श्री. व्ही.एन.तायडे (येथून पुढे जनमाहिती अधिकारी संबोधले जाईल.) हे हजर होते. अपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग

मंडळ, मुंबई (येथून पुढे अपिलिय अधिकारी संबोधले जाईल.) हे अनुपस्थित आहेत व त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना त्यांच्या वतीने हजर राहण्याकरिता प्राधिकृत केले आहे. तशा अर्थाचे पत्र त्यांनी आयोगाकडे दाखल केले आहे. त्यांची ही कृती बरोबर नाही. या पुढे माहिती आयोगाच्या सुनावणी करिता सूचना पत्र प्राप्त झाल्या नंतर त्यांनी प्राधान्याने या सुनावणीस हजर राहावे, अशा सूचना त्यांना आयोगा तर्फे देण्यात येत आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम दिनांक- १८-०९-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) दिनांक- २४-०८-२००४ रोजी मंडळाने घेतलेल्या ठरावाची पुर्ण प्रत व या ठरावाची विषयपत्रिकेची प्रमाणित प्रत.

२) दिनांक- २८-०७-२००४ जि.ग्रा.अ.पदासाठी संदर्भीय जाहिरती नुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व शासनास या बाबतीत केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्राच्या प्रती.

३) दिनांक- १३-०८-२००४ रोजी मंडळाने केलेल्या तारेच्या आऊटवर्ड रजिष्टरचि प्रत व माहे ऑगस्ट २००४ या महिन्याचे टेलिग्राम ऑफिस कडून आलेल्या बिलाची प्रत.

४) जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी पद-१ खुले दि. २८-७-०४ नुसार आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व त्या अनुषंगाने पाठविल्या गेलेल्या अहवलाच्या प्रति. (वरील १ ते ४ मुद्यावर माहिती द्यावी.)

सदर माहिती अर्जदाराने टपाला व्दारे अपेक्षिली असून सदर अर्जामध्ये अर्जदाराने विशीष्ट कालावधीचा उल्लेख केलेला नाही.

सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- २०-०९-२००६ रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले. सदर अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक- एफ/ मा.अधिकार/१९४७०/ १९४७१ या क्रमांकाच्या व ०३ ऑक्टोंबर,२००६ या तारखेच्या पत्राव्दारे अर्जदारास आवश्यक ती माहिती पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

तथापि जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना पाठविलेल्या माहितीवर अर्जदाराचे समाधान न झाल्यामूळे त्यांनी प्रथम अपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- २०-१०-२००६ रोजी प्रथम अपिल केले.

या अपिलावर अपिलिय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता अर्जदारास त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक- माआ-२४२०७, दिनांक- २० नोव्हेंबर, २००७ अन्वये अर्जदारास पत्राव्दारे उत्तर दिल्याचे दिसते. या उत्तरा सोबत त्यांनी पृष्ठ १ ते २४ असे क्रमांक धारण केलेली कागदपत्रे पाठविल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसते.

अपिलिय अधिकारी यांचे अपिल ठरविण्याची ही पध्दत चुकीची आहे. त्यांनी यापूढे अपिल ठरवितांना जनमाहिती अधिकारी व अर्जदार या दोघांना बोलावून घेवून या दोघांच्या समक्ष सुनावणी घ्यावी व त्यामध्ये आपला निर्णिय जाहिर करावा. अपिलिय अधिकारी यांनी अर्जदारास लिहिलेल्या दिनांक- २० नोव्हेंबर, २००६ च्या पत्रावरुन असे दिसून येते की, अपिलिय अधिकरी यांनी अर्जदारास चार मुद्यावर माहिती दिली आहे.

तथापि अर्जदाराचे यावर समाधान न झाल्यामूळे व्यथीत होवून त्यांनी दिनांक- २९-०१-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे अपिल दाखल केले. अपिलामध्ये अपिलकाराने, माहिती पूर्ण दिली नाहीत. उत्तरे संदीग्ध दिली आहे व माहिती कार्यालयाकडून माहिती मिळत नाही. अशी उत्तरे दिली आहेत. व्दितीय अपिलामध्ये अर्जदाराने त्यांच्या मूळ अर्जातील माहिती कायम ठेवली

आहे. आज सुनावणीमध्ये अर्जदाराने मागीतलेली वरील चार मुद्या पैकी मुद्दा क्रमांक-१ च्या संबधात माहिती अपिलीय अधिकारी यांनी अर्जदारास दिनांक- २० नोव्हेंबर, २००६ च्या पत्रात दिली आहे. मुद्दा क्रमांक-२ च्या संदर्भातील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपिलकारास प्रथम दिलेल्या पत्रात दिनांक- ०३ ऑक्टोंबर, २००६ च्या पत्रासोबत दिली आहे. मुद्दा क्रमांक-३ च्या संदर्भात अर्जदाराने मागीतलेली टेलीग्राम आऊटवर्ड रजिष्टरची छायाकिंत प्रत व मुलाखतीचा अहवाल ज्या संदर्भात टेलिग्राम आऊटवर्ड रजिष्टर संबधीत कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामूळे त्या रजिष्टरची प्रत वगळता इतर सर्व माहिती अर्जदारास दिली आहे.

या प्रकरणाची माहिती घेतली असता महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाने जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी वर्ग-२ या पदाकरिता सर्व प्रथम वृतपत्रात जाहिरात देवून ईच्छूक उमेदवाराकडून अर्ज मागविले होते व त्याप्रमाणे त्यांची मुलाखत दिनांक- ०९ ऑगस्ट, २००४ रोजी घेतली. तथापि या मुलाखतीमध्ये खादी व ग्रामोद्योग मंडळास योग्य तो उमेदवार न मिळाल्यामूळे त्यांनी ही निवड प्रक्रिया रद्द केली व तद्नंतर जिल्हा सेवायोजन कार्यालया मार्फत या पदावर नेमणूक केली. असे जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले.

वास्तविकत: अशा संवेदनशिल बाबीमध्ये खादी व ग्रामोद्योग मंडळाने सदरील रजिष्टर जपून ठेवणे आवश्यक असतांनाही आजमितीस सदर रजिष्टर खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे उपलब्धन नसल्याचे जनमाहिती अधिकारी सांगत आहेत. ही बाब कोणत्याही सामान्य नागरीकास उद्विग्न केले अशीच आहे. तेंव्हा या रजिष्टरचा जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळातील संबंधीत अधिकारी यांनी कसोशीने शोध घ्यावा व आवश्यक वाटल्यास संबंधितावर योग्यती प्रशासकिय किंवा फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करावी. असे त्यांना आदेशीत करण्यात येत आहे.

तसेच अर्जदारास या प्रकरणा संबंधातील सर्व नस्त्या पहाण्यासाठी अर्जदाराने त्या करिता स्वतः लेखी मागणी केल्यानंतर माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदी नूसार त्वरीत उपलबध करुन द्याव्यात, अशी सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी खादी व ग्रामोद्योग मंडळ यांना देण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अर्जदाराने खादी ग्रामोद्याग मंडळाकडे मागणी केल्यास माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार नस्त्या पहाणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद, दिनांक- १५ मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार श्री. कुडलीक बापुराव डव्हारे, मु.वलखेड, पो.परतूर, जिल्हा- जालना.

२. जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ०३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपिल क्रमांक-२००७/७४/
निर्णय दिनांक- १५ मार्च, २००७.

१. श्री.शंकर मारोती इंगळे, -- अपीलकर्ता
आनंद नगर चौक, नांदेड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
महिला व बालविकास
जिल्हा परिषद, नांदेड.

२. अपिलिय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, नांदेड.

## -विवेचन-

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १५ मार्च, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री.शंकर मारोती इंगळे (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल) जनमाहिती अधिकारी तथा उप-मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास जिल्हा परिषद, नांदेड श्री.एन.एस.इंगळे ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) हे

हजर आहेत. श्री.कुलकर्णी ए.आर. बालविकास प्रकल्प अधिकारी नांदेड हेहि हजर आहेत. तसेच अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) हें प्रथम सुनावणीच्या वेळी सुध्दा आयोगा समोर हजर झाले नाहीत व व्दितीय सुनावणीचया वेळी सुध्दा गैरहजर राहिले. त्यांच्या हया वर्तनाची आयोगाने सखेद नोंद घेतली असून त्यांच्या वर्तनाची सचिव, ग्रामविकास यांनी चौकशी करावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम दिनांक- २८-०८-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

" १) एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत पुरक पोषन आहारासंबंधी महाराष्ट्र शासनाने काढलेल्या परिपत्रकाची प्रत द्यावी.

२) या योजनेत आहाराच्या दरात नुकतीच वाढ करण्यात आली. त्या संबंधीचे परिपत्रकाची प्रत द्यावी.

३) या योजने अंतर्गत ' लहान ' ता.अधापूर येथील सर्वसाधारण मुले,गर्भवती स्त्रिया स्तनदा माता आणि किशोरी शक्ती योजने अंतर्गत किती लाभर्थ्यांना एप्रिल ०६ ते ऑगस्ट ०६ या काळात दरमहा किती रकम दिली किंवा देणे आहे याची यादी द्यावी.

४) ' लहान ' येथील प्रत्येक अंगनवाडीतील विद्यार्थी संख्या द्यावी. अन्न शिजविणा-या व्यक्तीचे नावे द्यावीत.

५) प्रत्येक अंगनवाडीकडून आलेल्या पोषन आहाराच्या मागणी अर्जाच्या प्रति ( जानेवारी ०६ ते ऑगस्ट, ०६) द्याव्यात व त्याप्रमाणे आपण पुरवठा केलेल्या आहाराचा तपशील द्यावा.

६) अन्न शिजविण्यासाठी सध्या काय दराने अनुदान मिळते. जानेवारी, २००६ ते ऑगस्ट, २००६ पर्यंत लहान येथील प्रत्येक अंगनवाडीला अनुदानाची किती रक्कम केंव्हा दिली किती देणे बाकी आहे.

७) आलेल्या बीलाची तपासणी कोण करते. बील मंजूरी कोण करते. तपासणी अधिका-यांनी मारलेल्या शे-याच्या कागदाच्या झेरॉक्स प्रति द्याव्यात.

८) सर्व प्रति प्रमाणित करुन द्याव्यात.

सदर माहिती अर्जदाराने व्यक्तीशः अपेक्षिली असून माहितीचा कालावधी जानेवारी, २००६ ते ऑगस्ट, २००६ असा उल्लेखिलेला आहे. अर्जदाराच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणतेही उत्तर पाठविले नाही, असे अर्जदाराचे म्हणणे आहे. या सदर्भात विचारले असता जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित माहिती बालविकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्रथम दिनांक- १९-१०-२००६ रोजी मागविली होती. म्हणजचे या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्या संदर्भातील प्रक्रिया देखील विहित कालावधी पेक्षा २१ दिवस इतक्या उशिराने सुरु झाली. जनमाहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक- १९-१०-२००६ रोजीचे पत्र प्राप्त झ ााल्यानंतर बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्रमांक- ५७९/२००६-२००७, दिनांक- ३०-१२-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये पाठविली. या पत्रावर जरी दिनांक- ३०-१२-२००६ अशी तारीख दर्शविली असली तरी अर्जदारास हे पत्र दिनांक- १४-०२-२००७ रोजी प्राप्त झाल्याचे पोष्टाच्या शिक्यावरुन दिसून येत आहे. यावरुन बालविकास प्रकल्प अधिका-याच्या कार्यपध्दती बाबत देखिल शंका घेण्यास भरपूर वाव आहे, असे आयोगास वाटते.

थोडक्यात अर्जदारास अपूर्ण माहिती पाठविणे व तीहि सुमारे साडेपाच महिने इतक्या उशीराने व अर्धवट दिल्याचे दिसून येते. अर्जदारास विहीत मुदतीत माहिती न मिळाल्यामूळे दिनांक- १३-१०-२००६ रोजी प्रथम अपिलिय अधिकारी यांच्याकडे अपिल केले. तथापि उपलब्ध

कागदपत्रावरुन प्रथम अपिलिय अधिकारी यांनी अपिलकाराची कोणतीही सुनावणी घेतल्याचे आढळून येत नाही.

जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी कोणताही सकारात्मक प्रतिसाद न दिल्यामूळे अर्जदाराने व्यथीत होवून दिनांक- ०२-१-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. या व्दितीय अपिला मध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती तर दिलीच नाही परंतू खोटी आश्वासने देवून चार तास तिष्ठत ठेवून अर्जदारास मानसिक व आर्थीक त्रास दिला. म्हणून जनमाहिती अधिकारी यांना माहिती अधिकार कायदयातील कलम २० (१) अन्वये प्रतिदिन २५० रुपये शास्ती लावण्याची विनंती केली आहे. त्याच बरोबर अपिलिय अधिकारी यांनी सुनावणी ठेवण्यास हलगर्जीपणा दाखविल्यामूळे त्यांच्या विरुध्द सेवानियमा नुसार शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्याची आयोगाला विनंती केलेली आहे.

आज झालेल्या युक्तीवादामध्ये अर्जदाराने वरील आठ मुद्यांपैकी माहिती अर्जातील मुद्दा क्रमांक-५ व ६ या दोन मुदयांची माहिती त्यांना अद्यापहि पूर्णत: मिळाली नसल्याचे सांगितले. त्याचबरोबर उर्वरित सर्व मुद्यांची माहिती त्यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी कबुल केले.

मुद्दा क्रमांक-५ व ६ चे बाबत अद्यापहि अर्जदारास जी माहिती देणे बाकी आहे अर्जदाराने त्यांना हवी असलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपात आहे तथापि त्याची उत्तरे अर्जदारास माहिती होण्याच्या दृष्टीने व शासकीय कारभारामध्ये पारदर्शकता ठेवण्यासाठी जो या कायद्याचा मूळ उद्देश आहे - देणे आवश्यक राहील असे आयोगाचे मत आहे. तेंव्हा या दोन मुद्यांवरील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास सात दिवसाचे आत प्राप्त होईल, असे पहावे. आजच्या सुनावणी मध्ये जनमाहिती अधिकारी यांनी ही माहिती सात दिवसाच्या आत अर्जदारास प्राप्त करुन देण्यात येईल, असे आयोगास लेखी आश्वासित केले आहे.

या प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती देण्यास जो अक्षम्य विलंब लावला आहे. त्या संदर्भात त्यांच्या विरुध्द प्रशासकीय चौकशी संबंधित प्राधिकरणाने करावी व इत:पर अशा प्रकारच्या अर्जदारांना कोणत्याही प्रकारे कार्यालयात बोलावून माहिती देण्यासाठी तिष्ठत ठेवणे व शारिरिक व मानसिक त्रास होईल, अशा त-हेचे वर्तन त्यांचेकडून भविष्यात घडणार नाही याची दक्षता संबंधित प्राधिकरणाने घ्यावी.

या प्रकरणी नांदेड जिल्हा परिषदेचे जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी यांनी दाखविलेल्या उदासिनते बाबत आयोग तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. अपिलिय अधिकारी यांनी या प्रकरणात स्वतः अपिल न घेणे व आयोगाच्या दोनहि वेळेच्या सुनावणीच्या दिवशी गैरहजर राहणे, ही बाब सचिव ग्रामविकास विभाग यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे व माहिती अधिकार कायदा २००५ च्या अंमलबजावणी संदर्भात त्यांनी दाखविलेल्या उदासिनवृत्तीची यथायोग नोंद घेण्याचे सूचविण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

निर्णय

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांना यांच्या विरुध्द प्रशासकीय चौकशी संबंधित प्राधिकरणाने करावी.

औरंगाबाद, दिनांक- १५ -०३-२००७

( वि.बा.बोरगे )
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रत-

१. अर्जदार श्री.शंकर मारोती इंगळे,आनंद नगर चौक, नांदेड

२. जनमाहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालविकास, जिल्हा परिषद, नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. श्री.दौड,सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय,, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

६. निर्णयनस्ती.

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/७८**
निर्णय दिनांक- १६ मार्च, २००७.

१. श्री.गजानन विठ्ठल पाटील -अपिलकर्ता.
मोंढा रोड गंगापूर जि. औरंगाबाद.

**विरुध्द.**

**१.** जनमाहिती अधिकारी तथा **- उत्तरवादी.**
तहसीलदार, गंगापूर

२. अपिलिय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, वैजापूर.

## -विवेचन-

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- १६ मार्च,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. गजानन विठ्ठल पाटील (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल.), जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री. अे.झेड.बनसोडे, हे हजर आहेत. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.सोरमारे, हे गैरहजर आहेत. त्यांचे वतीने श्री.आर.आर.कुलकर्णी, स्टेनो हे हजर आहेत. अशा

महत्वाच्या सुनावणीच्या कामी अपिलिय अधिकारी यांनी त्यांच्या वतीने स्टेनोला पाठविणे ही त्यांची कृती बेजबाबदारपणाची व आयोगा विषयी अनादार व्यक्त करणारी अशी ठरते. त्यांनी दाखविलेल्या या प्रवृती बाबत आयोगा तर्फे ताकीद देण्यात येत असून जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांच्या या वर्तनाची आवश्यक ती नोंद घेवून या पुढे राज्य माहिती आयोगाच्या सुनावणीस त्यांना बोलाविणे झालया नंतर त्यांनी स्वतः आयोगा समोर हजर राहणे हे त्यांच्यावर बंधनकारक असल्याचे त्यांना स्पष्ट करावे.

वरील प्रकरणी अर्जदार यांनी सर्व प्रथम दिनांक- २८-०८-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे खालील प्रमाणे माहिती मागितली होती.

" गंगापूर आणि वाळूज येथील २००४/ २००५ तसेच ३१/३/२००६ अखेर अकृषिक कर आणि गौण खनिज कर बाकी असणा-या व्यक्तींची त्यांच्याकडे असणा-या बाकीच्या रकमेसह यादी. "

सदर माहिती त्यांनी व्यक्तीशः अपेक्षीली होती. आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी त्यांनी त्यांच्या मागणीत नमूद केलेला आहे.

जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदाराच्या या अर्जास योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामूळे त्यांनी अपिलिय अधिकारी यांच्याकडे दिनांक- ०१-११-२००६ रोजी प्रथम अपिल केले. अपिलाच्या या अर्जावर अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २२-११-२००६ रोजी सुनावणी घेवून अपिला संदर्भात दिनांक- ३०-१२-२००६ रोजी निर्णय दिला. या निकालामध्ये त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी, अर्जदाराने दिनांक- २८-०८-२००६ रोजीच्या अर्जा अन्वये मांगेगाव, तलपिप्रीं तालूका-गांगपूर येथील महसूल अकृषिक कर आणि गौणखनिज कर बाकी असणा-या व्यक्तींची यादी अपिलार्थी यांना त्वरीत पुरवावी असे यांना आदेशित केले.

अर्जदाराने सुरुवातीस प्रथम केलेल्या अर्जामध्ये गंगापूर आणि वाळूज या ठिकाणच्या सबंधात माहिती मागविली होती. तथापि दिनांक- ०१-११-२००६ रोजी अपिल करतांना मांगेगाव व तलपिंप्री येथील गावाची वरील विषया संदर्भात जादा माहिती मागविली होती. ही जादा माहिती अर्जदाराची ही कृती बरोबर नसून अर्जदाराने मूळ मागणीचा अर्जा व्दारे जी मागणी केली आहे तीच मागणी अपिलाच्या अर्जामध्ये ठेवणे अथवा जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अर्धवट किंवा अपूर्ण माहिती मिळाल्याचे अर्जदाराचा समज झाल्यास त्या प्रमाणे त्यांनी अपिलामध्ये उल्लेख करावयास हवा होता, माहितीचा मूळ पाया अपिलामध्ये बदलणे किंवा वाढविणे अशा प्रकारची कृती अर्जदाराने करणे हे गैर आहे, अशी समज आज सुनावणीच्या वेळेस अर्जदारास देण्यात आली.

तथापि अपिलिय अधिकारी यांनी अर्जदाराच्या वाढीव मागणीची दखल घेवून तीन गावाची माहिती देण्याचे  अपिलात निर्णय देतांना नमूद केले आहे. अपिलिय अधिकारी यांनी अर्जदाराच्या मूळ माहितीचा अर्ज पडताळून पाहून त्यामधील वाळूज या गावाचा उल्लेख आपल्या निर्णयातून वगळला आहे. अपिलिय अधिकारी यांनी या पुढे अपिल ठरवितांना प्रथम अपिलावर निर्णय देतांना अशा बाबीची पुनरावृती होणार नाही याची योग्य ती काळजी घ्यावी, असेहि त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या सबंधित निर्णयाच्या प्रक्रियेच्या संदर्भातील कागदपत्राची पहाणीकरता अपिलिय अधिकारी यांनी दिनांक- २२-११-२००६ रोजी सुनावणी घेतली व दिनांक- ३०-१२-२००६ रोजी निर्णय दिला व सदर निर्णय अर्जदारास दिनांक- १७-०१-२००७ रोजी कळविला. सदर कालापव्यय पाहता अपिलिय अधिकारी यांनी हे प्रकरण आवश्यक त्या गांर्भीयाने घेतले नसल्याचे कागदोपत्री दिसून येत आहे  व त्याच बरोबर त्यांनी आपल्या कृती व्दारे या कायद्याविषयी अनादार व्यक्त केला आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. त्यांना आयोगा तर्फे त्यांच्या हातून या प्रकरणी झालेल्या

विलंबा बाबत समज देण्यात येत असून जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी त्यांच्या वर्तनाची यथा योग्य नोंद घ्यावी. असे सूचीत करण्यात येत आहे.

अपिलिय अधिकारी  यांनी जनमाहिती अधिकारी यांना दिनाक- ३०-१२-२००६ रोजी ही माहिती अर्जदारास देण्या विषयी सूचना देवूनही अपिलार्थी यास व्दितीय अपिल करेपर्यंत म्हणजे दिनिांक- १६-०१-२००७ रोजी अर्जदारास ही माहिती दिली नाही. तद्नंतर त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे हे अपिल  दाखल केल्यानंतर अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- ०८-०२-२००७ रोजी  त्यांचेकडील पत्र क्रमांक जा.क्र.२००७/जमा-२-कावी-, दिनांक- ०८-०२-२००७ रोजीच्या पत्रा अन्वये दिल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसते. सदर माहिती अर्जदारास दिनांक- १६-०२-२००७ रोजी व्यक्तीशः दिल्याची नोंद या कागदपत्रात उपलब्ध आहे व अर्जदाराने ही माहिती दिनांक- १६-०२-२००७ रोजी  मिळाल्याचे आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे. अपिलार्थीस सदर माहिती संपूर्णतः मिळाली आहे व आता या विषयावर त्यांचे म्हणणे काही नाही. असे त्यांनी शपथपत्रावर कबूल केले आहे.

माहिती देण्यास एवढा उशिर होण्याची कारणे विचारली असता जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज त्यांना दिनांक- २८-०८-२००६ रोजी प्राप्त झाल्या नंतर त्यांनी ताबडतोब दिनांक- ३०-०८-२००६ रोजी ही माहिती ज्या तलाठयाकडून त्यांना  अपेखित होती त्या तलाठयांना पत्रे लिहून माहिती  देण्याची सूचना दिल्या. या प्रकरणामध्ये माहिती देण्या संदर्भात एकूण चार तलाठी संबंधीत असून सदर तलाठी सजा गंगापूर, वाळूज, मांगेगाव आणि तळपिंप्री हे आहेत. तहसीलदार गंगापूर यांनी स्मरणपत्रे व दुरध्वनि व्दारे व पाठपूरावा करुन देखील सदर तलाठयांनी जनमाहिती अधिकारी यांना दिनांक- ०३-०२-२००६ ते ०९-०२-२००६ या कालावधी मध्ये माहिती पुरविली आहे. यातील महत्वाचा मुद्दा म्हणजे एकूण चार तलाठया पैकी तीन तलाठयांनी ९८ दिवस इतक्या विलंबाने " निरंक" माहिती कळविली आहे. तर जनमाहिती अधिकारी यांच्याच मुख्यालयी म्हणजे

गंगापूर येथे असणा-या तलाठयाने थकबाकीदारांची यादी उशिराने दिलेली आहे. त्यांना ही माहिती देण्यास ९८ दिवस इतका विलंब लागला आहे. वास्तविकत: जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदाराचा अर्ज प्राप्त झाल्या नंतर तात्काळ सर्व तलाठी बोलावून घेवून सदर माहिती अर्जदारास पुरविणे हे माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतूदीनूसार अपेक्षित आहे. तथापि ही माहिती ९८ दिवस इतक्या उशिराने व तेहि अपिलिय अधिकारी यांनी सूचना दिल्या नंतर देणे ही कृती प्रशासकिय दृष्टया योग्य तर नाहीच परंतु माहिती अधिकार कायदा २००५ च्या मधील तरतूदी व या कायद्या विषयी जनमाहिती अधिकारी यांचे मनातील अनादार दर्शवणारी प्रवृत्ती स्पष्ट करीत आहे, असे आयोगाचे मत झाले आहे. याची यथायोग्य नोंद जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी घ्यावी. जनमाहिती अधिकारी यांनी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे कडील पत्र जा.क्र. २००५/साशा/संकीर्ण/क्रेंमाअ/ कावी, दिनांक- १२-१२-२००५ रोजीच्या आदेशा अन्वये संबंधित गावच्या तलाठयास माहिती अधिकारी म्हणून घोषीत केले आहे. त्यामूळे त्यांच्या कडून येणा-या माहितीवर जनमाहिती अधिकारी हे विसंबून राहिले, असे स्पष्ट केले.

जनमाहिती अधिकारी यांचा हायुक्तीवाद ऐकता जिल्हाधिकारी औरंगाबाद यांनी वर निर्देशीत केलेल्या आदेशाचा पूर्नविचार करावा व माहिती अधिकार कायदा २००५ ची परिणामकारक व कायद्यात अभिप्रेत असलेल्या संबंधीत तरतुदीची अंमलबजावणी, जनतेच्या दृष्टीने योग्य त-हेने होण्या करीता वरील आदेश सुधारित करावेत, असे त्यांना सुचविण्यात येत आहे. त्याच बरोबर वरील प्रकरणात समाविष्ट असलेल्या चारहि तलाठयांच्या विरुध्द उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांनी तात्काळ महाराष्ट्र सेवा वर्तणूक नियम १९७९ अन्वये विभागीय चौकशी करावी व त्या संदर्भातील कार्यवाहीचा अहवाल राज्य माहिती आयोगाकडे दोन महिन्यात पाठवावा. असे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

<u>**निर्णय**</u>

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद, दिनांक- १६ मार्च, २००७ **( वि.बा.बोरगे )**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

<u>**प्रत-**</u>

१. श्री.गजानन विठ्ठल पाटील ,सोनहिरा मोंढा रोड, गंगापूर, जिल्हा- औरंगाबाद.

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गंगापूर यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वैजापूर यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १२ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई -३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

**६.** निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद/नाशिक**

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/८३
निर्णय दिनांक- २० मार्च, २००७.

१. सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर --अपिलकर्ता
व्दारा ब्रद्रुककर निवास, विद्यानगर,
परळी वैजनाथ, जिल्हा-बीड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी.
प्रशासकिय अधिकारी,
सहसंचालक (उच्चशिक्षण)
कार्यालय, औरंगाबाद.

२. अपिलिय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्चशिक्षण)
सहसंचालक कार्यालय,औरंगाबाद.

**-विवेचन-**

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २० मार्च, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल) जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी सहसंचालक (उच्चशिक्षण)

कार्यालय, औरंगाबाद, (येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) श्री.अर्जून पाटील तसेच अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक (उच्चशिक्षण) सहसंचालक कार्यालय, औरंगाबाद (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.आर.बी.कान्हेरे ,हे हजर आहेत.

या प्रकरणी सर्व प्रथम अर्जदाराने जनमाहिती अधिकारी यांचेकडे त्यांचे दिनांक- ०५-१०-२००६ रोजीच्या अर्जानूसार खालील सतरा मुद्यांवर माहिती मागविली होती.

"१) मा.शिक्षण संचालक,पुणे यांना पत्र क्र. ६२१३ दिनांक- १३,१४-१०-२००५ रोजी दिलेल्या पत्रावर (श्री.प्रमोदपल्ली यांचे वय क्षमापन बाबत कै.ल.दे.म.परळी वै.) आपल्या कार्यालयातील स्वाक्षरी करणा-या अधिका-याचे पदनाम व संपूर्ण नाव द्यावे. (२) सदरपत्रासाठी आपल्या कार्यालयाने तयार केलेल्या कार्यालयीन टिपणीच्या सत्यप्रती द्याव्यात. (३) आपल्या कार्यालयास महाविद्यालयाने दिलेले पत्र क्र.२४६, दिनांक-१०-०२-२००५ च्या पत्राची व सोबतच्या अनुभवाच्या कागदपत्राच्या सत्यप्रती द्याव्या. (४) मा.शिक्षण संचालक, पुणे यांचे वयक्षमापना बाबत पत्र क्र. एनजीसी/२००६/वय/क्षमा-३, दिनांक- ११-०५-२००६ चे आपल्या कार्यालयास दिलेल्या पत्राची सत्यप्रत द्यावी. (५) मा.शिक्षण संचालक, पुणे यांचे वय क्षमापित रद्दसंबंधी दिलेले दिनांक- ८-९-२००६ चे आपलया कार्यालयास दिलेल्या पत्राची सत्यप्रत ( ६ ) मा.शिक्षण संचालक पुणे यानी आपल्या कार्यालयास दिलेल्या दि. ८-९-२००६ च्या पत्राबाबत आपल्या कार्यालयाने केलेल्या करवाई अहवाल/ पत्राची कार्यालयीन टिप्पणीच्या सत्यप्रती द्याव्यात. (७)श्री.प्रमोद पत्की यांना दिलेले वेतन आपल्या कार्यालयाकडून वसूल करण्यात येईल किंवा कसे या बाबत कायदेशिर कारणे द्यावीत. (८) संस्थेने / महाविद्यालयाने श्री.प्रमोद पत्की यांचे वय क्षमापना बाबत पूनर्प्रस्ताव आपल्या कार्यालयात दिला असल्यास त्या प्रस्तावाची व सदर प्रस्तावावर आपल्या कार्यालयाने घेतलेल्या निर्णयाची सत्प्रत द्यावी. (९) अपंग अनुशेष भरती

बाबत शासन/ संचालक यांच्या मा. न्यायालयीन निर्णयानूसार दिलेल्या पत्राच्या/ आदेशाच्या सत्यप्रती. (१०) विभागातील महाविद्यालयाच्या शिक्षकेतर भरती करतांना अपंग अनुशेष भरावा याबाबत आपण दिलेल्या पत्राची सत्यप्रत. (११) कै.ल.दे. महिला महाविद्यालय परळी वै.च्या शिक्षकेतर कम्रचारी पदमान्यतेच्या सन १९९७- २००६ पर्यंतच्या सत्यप्रती. (१२) सदर महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचा-याचे आपल्या कार्यालयाने मान्य केलेल्या रोस्टरच्या सत्यप्रती. (१३) सदर महाविद्यालयाने दि. ९-९-२००६ रोजी सर्वसाधारण वर्गातील कनिष्ठ लिपिकाची जागा भरणेची जाहीरात दिली आहे. मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दि ७-९-०६ रोजी दिलेल्या आदेशात अपंगाच्या जागा भरल्या शिवाय इतर जागा भरणेस मनाई केली आहे. सदर जाहीरात मा. न्यायालयाचा अवमान करुन दिली आहे याबाबत आपल्या कार्यालयाकडे तक्रार दिली आहे. त्याबाबत आपल्या कार्यालयाने केलेल्या कारवाई अहवालाची सत्यप्रत द्यावी. (१४) संख्याशास्त्रातील पीएचडी प्राप्त उमेदवार पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून एम.एस्सी गणित या विषयाच्या अध्यापनासाठी व नियुक्तीसाठी पात्र आहे का ? असल्यास शासन नियमाची सत्यप्रत द्यावी. (१५) कै..ल.दे..म.म.परळी वै. येथील शिक्षकेतर भरती बाबत आपल्या कार्यालयाकडे सन २००६ या वर्षात दिलेल्या तक्रारीच्या सत्यप्रती. सदर शिक्षकेत्तर भरती बाबतच्या तक्रारीवर आपल्या कार्यालयाने केलेल्या कारवाई अहवालाच्या सत्यप्रती. (१६) सदर महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या रोस्टरमधील बदलाबाबत दिलेल्या तक्रारीच्या व कारवाई अहवालाच्या सत्यप्रती (१७) दप्तर दिरंगाई कायद्यानूसार दिलेल्या निवेदन/ तक्रारीवर किती दिवसात कारवाई करणे आवश्यक आहे मी दिलेल्या तक्रारी/निवेदनावर कारवाई केली आहे का? नसल्यास दोषी अधिका-याचे पदनाम व संपूर्ण नांव द्यावे.

अर्जदाराच्या दिनांक- ०५-१०-२००६ रोजीच्या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक- १६-१०-२००६ रोजीच्या पत्रा अन्वये अर्जदारास सर्व मुद्यांवर उत्तर दिल्याचे माहिती आयोगास आज उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येते. तथापि जनमाहिती अधिकारी यांचे उत्तराने समाधान न झालेमूळे अर्जदाराने अपिलिय अधिकारी

यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल दिनांक- ०९-११-२००६ रोजी केले. अपिलिय अधिकारी यांनी या अपिलावर कोणतीहि सुनावणी न घेता अर्जदारास त्यांनी त्यांचे कडील पत्र क्रमांक जा.क्र. जन क्र. अनु.४/२००६-०७, दिनांक- १८-११-२००६ अन्वये अर्जदारास एक पत्र पाठवून अर्जदाराने मूळ अर्जात मागीतलेली माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. अपिलिय अधिक-याची अपिल ठरविण्याची पध्दत चुकीची असून त्यांनी या प्रकरणी जनमाहिती अधिकारी व अर्जदार या दोघांनाहि एकाच दिवशी व ऐकाच वेळी बोलावून घेवून सुनावणी घ्यावयास हवी होती व त्यामध्ये त्यांनी त्यांचा निर्णय देणे अपेक्षित होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची सुनावणी या प्रकरणी घेतली नसल्याचे त्यांनी आज सुनावणीमध्ये कबूल केले आहे.

अपिलिय अधिकारी यांच्या वरील प्रकारच्या उत्तरामूळे व अर्जदारास अपूर्ण प्राप्त झालेल्या माहितीवर व्यथीत होवून अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- २२-०९-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. या व्दितीय अपिलाची कारणे अर्जदाराने दिनांक- १६-१०-२००६ रोजीच्या अर्जाप्रमाणे माहिती न देता चुकीची व त्रोटक माहिती जनमाहिती अधिकारी यांनी देणे, व अपिलिय अधिकारी यांनी ही चुकीची त्रोटक माहिती देवून माहिती अधिका-याच्या कृत्यावर पांघरुन घालणे इत्यादि दिली आहे.

अर्जदार हया परळी वैजनाथ जिल्हा बीड येथील लक्ष्मीबाई देशमूख महिला महाविद्यालयात प्रथमतः जून १९९७ ते ऑक्टोंबर, २००३ या कालावधीमध्ये पूर्णवेळ अधिव्याख्याता म्हणून नोकरीस होत्या. सदर संस्थेने अर्जदारास त्या प्रमाणे नेमणूक पत्रहि दिले आहे. अर्जदाराने सदर संस्थेकडे चार वर्षे विनावेतन काम केले असल्याचे अर्जदाराने आज सुनावणीमध्ये सांगितले आहे. खाजगी महाविद्यालयांना शासनमान्यता प्राप्त झाल्यापासून सुरुवातीला तीन वर्षे कोणत्याही प्रकारचे अनुदान प्राप्त होत नाही. तद्‌नंतर चौथ्या वर्षापासून दर वर्षी २५ टक्के या प्रमाणे चार वर्षे अनुदान देवून संस्था स्थापनेनंतर सातव्या वर्षानंतर महाविद्यालयास शासनाकडून १०० टक्के

अनुदान प्राप्त होत असते, असे सहसंचालक (उच्चशिक्षण) औरंगाबाद यांनी आज सुनावणीमध्ये सांगितले. अर्जदार यांनी सुरुवातीला साडेसहा वर्षे सदर महाविद्यालयात अधिव्याख्याता या पदावर विनावेतन काम केल्याचे आज सुनावणीमध्ये सांगितले. तद्नंतर त्यांची नेमणूक नियमीत होण्याची वेळ आली असता, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी सदर पद अनुसूचीत जाती च्या संवर्गासाठी राखीव ठरविले. विद्यापिठा मध्ये या करिता स्वतंत्र आरक्षण कक्ष अस्तीत्वात असल्याचे सहसंचालक (उच्चशिक्षण) औरंगाबाद यांनी सांगितले.

प्रत्येक महाविद्यालयातील पदाचे आरक्षण हे विद्यापिठ ठरवीत असल्यामूळे या संदर्भातील घटनाक्रमाचा तपशिल इ. माहिती विद्यापिठाकडून प्राप्त करुन घेणे अर्जदारास सोयीचे ठरेल व सदर माहिती अर्जदारास विद्यापिठाकडे माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार वेगळा अर्ज करुन माहिती करुन घ्यावी लागेल, हे उघड आहे.

या प्रकरणी अर्जदाराने सहसंचालक (उच्चशिक्षण) औरंगाबाद यांच्याकडे ब-याच वेळा पत्रव्यवहार करुन व त्यास उत्तरे देवून देखील अर्जदाराचे अद्याप समाधान झाले नाही. तेंव्हा आजच्या सुनावणीमध्ये अर्जदाराच्या मूळ विनंती संदर्भात सहसंचालक (उच्चशिक्षण) औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयातील या विषयावरील सर्व उपलब्ध नस्त्या अर्जदारास पहाणीसाठी तात्काळ उपलब्ध करुन देण्याचे सहसंचालक (उच्चशिक्षण) औरंगाबाद यांनी आज सुनावणीमध्ये मान्य केले व अर्जदाराने त्याप्रमाणे सर्व नस्त्या पहाण्याची तयारी दर्शविली आहे. तव्दतच अर्जदारास हव्या असलेल्या या माहितीच्या संदर्भातील काही नस्त्या लक्ष्मीबाई महिला महाविद्यालयाकडे उपलब्ध असल्याचे अर्जदार यांनी सुनावणीमध्ये सांगितले तेंव्हा, सहसंचालक (उच्चशिक्षण) व त्याच बरोबर प्राचार्य, लक्ष्मीबाई वरिष्ठ महाविद्यालय परळी वैजनाथ यांनी, अर्जदार यांनी महाविद्यालयास माहिती अधिकार २००५ मधील तरतूदी नूसार लेखी विनंती केल्यास त्या विनंतीनूसार अर्जदारास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध असलेल्या सर्व नस्त्या

पहाणी करिता अर्जदारास उपलब्ध करुन द्याव्यात, असेहि आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१) अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सहसंचालक (उच्चशिक्षण) औरंगाबाद यांनी अर्जदार यांनी नस्त्या पहाणीसाठी लेखी स्वरुपात विनंती केल्यास माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार अर्जदाराने अर्ज दिल्यापासून तीन दिवसाच्या आत अर्जदारास पहाणीसाठी नस्त्या उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद, दिनांक- २० मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार सौ. संध्या सखारामपंत आसेगावकर व्दारा/- ब्रुद्रककर निवास, शाळेच्या मागे विद्यानगर, परळी वैजनाब जिल्हा बीड.
२. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, सहसंचालक (उच्चशिक्षण) कार्यालय, औरंगाबाद यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. अपिलिय अधिकारी तथा सहसंचालक (उच्चशिक्षण) कार्यालय, औरंगाबाद यांना निकल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक- २००७/ ८५.**
निर्णय दिनांक- २० मार्च, २००७.

**१.** सौ.छाया गोपाळराव दुबे -- अर्जदार.
चैतन्य अपार्टमेंट, प्लॅट नं.१
व्यंकटेश मंगल कार्यालया समोर,
गारखेडा परिसर, औरंगाबाद.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी
तथा प्रशासक,
ओम प्राथमिक शाळा, एन-६,
सिडको, औरंगाबाद.

२. अपिलीय अधिकारी तथा **-- उत्तरवादी.**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

## -विवेचन-

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २० मार्च,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार सौ. छाया गोपाळराव दुबे, (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल.) , जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, ओम प्राथमिक शाळा, एन-६, सिडको, औरंगाबाद ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल) श्री. विलास

दिंगबरराव अंकमुळे व अपिलिय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.व्ही.आर.नेटके, हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदार यांनी प्रथम दिनांक- ३०-०१-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे एकूण ५३ मुद्यावर माहिती मागविली आहे.

१ जुलै, २००३ ऑगस्ट २००३, सप्टेंबर,२००३, ऑक्टोंबर,२००३, सौ.दुबे स.शि. ओ.प्रा.शा. यांनी आपल्याकडे केलेल्या वैद्यकिय रजेचा अर्ज. अर्जाची सत्यप्रत. रजा मंजूरीचे सत्यप्रत. सेवा पुस्तिकेची सत्यप्रत, प्रमुखाच्या स्वाक्षरीसह.
सौ.दुबे सी.जी. स.शि. होत्या, जुलै ०३ ते ऑक्टोंबर, ०३ व प्रभारी मु.अ. ही होत्या. असे वेळोवेळी आपण प्रतिज्ञा पत्राव्दारे मा.न्यायालयात ही सादर केले आहे.हे. आपणास केंव्हा व संस्थेच्या कोणत्या आदेशान्वये कळाले, त्याची सत्यप्रत.

२. सौ.दुबे सी.जी. स.शि. होत्या, जुलै ०३ ते ऑक्टोंबर, ०३ व प्रभारी मु.अ. ही होत्या. असे वेळोवेळी आपण प्रतिज्ञा पत्राव्दारे मा.न्यायालयात ही सादर केले आहे.हे. आपणास केंव्हा व संस्थेच्या कोणत्या आदेशान्वये कळाले, त्याची सत्यप्रत.

३. ऑगस्ट, २००३ मध्ये वेतन देयकात सौ.दुबे यांच्या पदासह इतर वेतनाचे सर्व रकाने कोरे रिक्त सोडण्याचे दाखविण्याची कारणे व सत्यप्रत.

४ सेवाजेष्ठतेस व मूळ मान्य पदास खालील कारणे सप्टेंबर ०३ ऑक्टोंबर २००३, सौ. दुबे सी. जी. यांचे नाव नंबर दोनला दाखविण्याचे संस्थेने आपणास दिलेल्या आदेशाची सत्यप्रत व जुलै ०३ ते ऑक्टोंबर ०३ पर्यतच्या शिक्षक हजेरी रजिस्टरची सत्यप्रत.

५ ऑगस्ट २००३ सौ. काळे, सौ. वाणी, सौ. देशमुख या ती शिक्षकांना वार्षिक वेतनवाढ देण्याचा अधिकार व त्यांचा गोपनीय अहवाल लिहिण्याचा व त्यांच्या सेवापुस्तिकेवर नोंद घेऊन स्वाक्षरी करण्याचा अधिकार आपणास संस्थेने दिला होता का ? गोपनीय

अहवालाची, आदेशाची सत्यप्रत व सेवापुस्तिकेची सत्यप्रत.

६ ऑक्टोंबर २००३ श्री पाल्हे यांना वार्षिक वेतनवाढ देण्याचा अधिकारी सेवापुस्तिकेत नोंद घेऊन त्यावर स्वाक्षरी करण्याचा अधिकार, गोपनीय अहवाल लिहिण्याचा अधिकार संस्थेने आपणास दिला होता काय ?

७ सौ. वाणी के. ए, श्री. शिंदे यु. एल. यांचे संयुक्त खात्यावरील वेतन त्यांच्या वैयक्तीक खात्यावर जमा करण्याचे संस्थेचे व त्या काळातील कार्यालय प्रमुखाच्या आदेशाची सत्यप्रत व त्यांना वार्षिक वेतनवाढ देऊन सेवापुस्तिकेत आपणास स्वाक्षरी करण्याचे संस्थेने दिलेले अधिकारपत्र.

८ श्री. राजपूत एस. एन. लिपिक यांना रुजु करुन घेण्याचे संस्थेचे आदेश होते का ? अठरा महिने सतत अनुपस्थित लिपिकास शासकीय वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र घेतल्याचे सत्यप्रत संस्थेच्या आदेशाची व संबंधित लिपिकास रुजु केल्याचा अहवाल संस्थेस कळविण्याच्या सत्यप्रती.

९ सतत अठरा महिने अनुस्थित लिपिकास माझ्या रजेच्या काळात आपणास अधिकार नसतांना रुजु करुन घेतले व त्यांचे नियमीत वेतनही काढले. लिपिकास आपण दि. ८-९-२००३ रोजी रुजु केले सप्टेंबरच्या वेतन देयकात त्यांना अनुपस्थित दर्शवितात ऑक्टोंबर ०३ मध्ये वेतन देयकात रुजु केल्याचे दर्शवितात त्याची कारणे व सत्यप्रती. लिपिकास नियमीत वेतन देण्याचे संस्थेच्या आदेशाची सत्यप्रत.

आपणास संस्थेच्या शाळेचे कार्यालयीन कामकाज करण्याचे संस्थेच्या आदेशाची सत्यप्रत

१२ आपले बदली प्रकरण न्यायप्रविष्ठ असताना आपणास संस्थेच्या शाळेचे पदभार कोणी दिले त्याची सत्यप्रत.

१३ आपली व आपल्यासह सौ. साधू, सौ. नाईक, सौ. देशमुख, श्री. स्वामी, सौ. आर्य या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या बदल्या संस्थेने केल्या. संस्थेच्या आदेशान्वये आपणास व संबंधित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना ओ. प्रा. शाळेतून कार्यमुक्त

केलेल्या आदेशाच्या सत्यप्रती.

१४ संस्थेच्या नरसाई प्रा. शाळेत रुजू होवून एक महिना काम केल्यानंतर आपण व वरील सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी पुनश्च ओ. प्रा. शा. रुजू झालात आपणास रुजु कोणी केले त्या रुजु अहवालाची सत्यप्रत ओ. प्रा. शाळेच्या मु. अ. च्या अहवालाची सत्यप्रत.

१५ नरसाई प्रा. शाळेच्या मु. अ. नी आपणास कार्यमुक्त केल्याची सत्यप्रत.

१६ बदली रद्द झाल्याचे बदली रद्द केल्याचे संस्थेच्या आदेशाची प्रत.

१७ बदली झाल्याच्या सेवापुस्तिकेतील नोंदी व त्यावर प्रमुखाची स्वाक्षरी व बदली रद्द झाल्याच्या सेवापुस्तिकेतील नोंदी संस्थेच्या आदेशाची सेवा पुस्तिकेत बदली प्रकरणी वेळोवेळी घेतलेली नोंद व प्रमुखाची स्वाक्षरी बदली प्रकरणातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या सेवापुस्तिकेच्या सत्यप्रती.

१८ श्री. राजपूत लिपिक १८ म. अनुस्थितीची शासकीय वैद्यकिय अधिका-यांच्या वैद्यकिय प्रमाणपत्रासह सेवापुस्तिकेत घेतलेली नोंद त्याची सत्यप्रत.

१९ संस्थेच्या ओ. प्रा. शाळेचे वेतनोत्तर अनुदान निश्चिती करुन घेण्याचे संस्थेने आपणास दिलेल्या अधिकाराची सत्यप्रत किंवा प्रशासकांची सत्यप्रत अनुदानाचे आदेशाची सत्यप्रत

२० आपणास मु. अ. म्हणून इंग्रजी मध्ये हेडमास्तर म्हणून शिक्का तयार करुन घेण्याचे संस्थेने दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

२१ शै. वर्ष २००३-०४ संच मान्यता करण्यासाठी संस्थेने दिलेल्या आदेशाची सत्यप्रत व संच मान्यता प्रस्तावाच्या सत्यप्रती.

३३ सौ. दुबे सी. जी. मुख्याध्यापिका यांची ऑक्टोंबर २००३ रजा संपल्यानंतर देखील आपल्या स्वाक्षरीने वेतन काढण्याचे संस्थेने दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

३४ मुख्याध्यापिका सौ. दुबे सी. जी. यांच्या रजेच्या काळात आपल्या सेवा पुस्तिकेत आपण मु. अ. म्हणून नोंद केल्यानंतर त्यावर संस्थेच्या सचिवांनी स्वाक्षरी केल्याची सत्यप्रत.

३५ ऑक्टोंबर २००३ आपणास मु. अ. म्हणून कार्य करण्यास संस्थेने दिलेल्या आदेशाची

सत्यप्रत व आपल्या आापल्या सेवापुस्तिकेत नोंद घेतल्याची संस्था सचिवांच्या स्वाक्षरी सह सत्यप्रत.

३६ सौ. वाणी के. ए. खारोळे यांची रोखलेली वेतनवाढ नियमीत देण्याचे संस्थेच्या आदेशाची प्रत.

३७ सौ. साधु यांचा नापरतावा धनराशीचा भविष्य निर्वाह निधी कार्यालय प्रस्ताव मु. अ. कार्यरत असतांना आपल्या स्वाक्षरीने प्रस्ताव सादर करण्याचे संस्थेने आपणास दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

३८ अंबाजोगाई बॅंक व इतर बॅंक शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या कर्ज प्रकरणी आपण आवश्यक त्या सर्व कागदपत्रावर मु. अ. म्हणून स्वाक्षरी करण्याचे संस्थेने दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

३९ मुख्याध्यापिका सौ. दुबे सी. जी. ऑक्टोंबर २००३ वेतन न काढण्याचे संस्थेच्या आदेशाची सत्यप्रत.

४० अनुपस्थित लिपिक यांना रुजू करण्याचे आदेश कोणाच्या नावे होते सत्यप्रत.

४१ सततअनुपस्थित लिपिकाची चौकशी गटशिक्षणाधिकारी प्रा. यांच्याकडे प्रलंबीत असतांना त्यांना रुजु करुन घेण्याचे संस्थेचे आदेश.

४२ मुख्याध्यापिका सौ. दुबे सी. जी. यांच्या रजेच्या काळात तात्पूरत्या स्वाक्षरीचे अधिकार देण्याचा प्रस्ताव सौ. जवळकर जे. एन. यांच्या नावे होता आपण आपल्या नावाचे आदेश कसे काय मिळून घेतले व संस्थेच्या कोणत्या आदेशान्वये त्याची सत्यप्रत.

४३ एकाच शाळेत दोन प्रभारी मु. अ. असल्याचे स्वाक्षरी रजिस्टर विविध न्यायालयात सादर करण्याचे आदेशाची सत्यप्रत. तसेच दोन प्रभारी मु. अ. कोणत्या वर्षापासून केव्हा व कोणकोण कार्यरत होते. दोन प्र. मु. अ ची नियुक्ती प्रशासकांनी केली त्या आदेशाची सत्यप्रत, संस्थेने केली संस्थेच्या आदेशाची सत्यप्रत.

४४ न्यायप्रविष्ठ याचिकेत, विविध न्यायालयात जि. प. कार्यालयात सर्व शिक्षकांच्या

स्वाक्षरीचे पत्र सादर करण्याचे आदेश प्रशासकांनी आपणास दिले होते काय ? आदेशाची सत्यप्रत.

२२ शै. वर्ष २००४-०५, २००५-०६ वर्गनिहाय विद्यार्थी संखेसह प्रस्तावाच्या सत्यप्रती.

२३ विद्यार्थी संख्ये अभावी समायोजन झालेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची नांवे कोणत्या वर्षापासून व कोणत्या शाळेत सत्यप्रती.

२४ आपणास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शाखा एन. ८ औ,बाद येथे आपल्या व मा. शिक्षणाधिका-यांच्या संयुक्त स्वाक्षरीने खाते काढण्याचा अधिकार व संस्थेच्या आदेशाची सत्यप्रत व व्यवहार करण्याच्या अधिकारीचा प्रत.

२५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंक शाखा एन. ८ मु. अ. व सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीचे खाते क्रमांकावर आर्थिक व्यवहार करण्यास संस्थेने दिलेल्या अधिकाराची सत्यप्रत.

२६ बालकमंदिर या वर्गास शिक्षिकेची नियुक्ती करण्याचे संस्थेने आपणास दिलेल्या अधिकाराची सत्यप्रत.

२७ बालकमंदिर ओ. प्रा. शाळेचा संपूर्ण आर्थिक हिशोब त्याची सत्यप्रत, प्रवेश फीस, टी. सी. फीस, परीक्षा फी, स्नेहसंमेलन फीस, शै. सहल फीस व इतर फीस ह्या सर्व फिस घेण्याचा अधिकार संस्थेने आपणास दिला का ? अधिकाराची सत्यप्रत व हिशोबाची वर्षनिहाय सत्यप्रत.

२८ विद्यार्थ्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यात No. १३६३ बदल करण्याचे दाखल्यावर मु. अ. म्हणून स्वाक्षरी करण्यास संस्थेने दिलेल्या आदेशाची सत्यप्रत. तसेच जि. प. कार्यालयाकडून पूर्व परवानगी घेवून दाखल्यात बदल केल्याची सत्यप्रत.

२९ संस्थेच्या ओ. प्रा. शाळेत पूर्ण वेतन घेवून काम करणा-या सेविकेच्या जागेवर मान्यता प्राप्त नसलेल्या इतर सेवकाची नियुक्ती करुन त्यास वेतन देणे याचा अधिकार आपणास कोणी दिला ? आदेशाची सत्यप्रत.

३० जि. प. कार्यालयास किमान अध्ययन क्षमता अनेक सेवाजेष्ठ शिक्षकांची नावे वगळून

यादी सादर करण्यास संस्थेने आपणास दिलेल्या अधिकाराची सत्यप्रत.

३१ संस्थेच्या ओ. प्रा. शाळेचा ताबा गुंडाच्या मदतीने घेवून संस्थेच्या शाळेच्या कार्यालयास शाळेतील स. शि. सोनवणे बी. आर. यांचे घरचे कुलून कार्यालयास लावण्यास संस्थेने आपणास दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

३२ संस्थेने आपणास मुख्याध्यापिकेच्या रजेच्या काळात शासकीय, निमशासकीय, कार्यालय, विविध बॅंका येथे मु. अ. म्हणून पत्रव्वहार करण्याचे आपणास दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

४५ मार्च २००४ एप्रिल ०४ मे ०४ जुन ०४ वेतन देयकावर स्वाक्षरी करण्याचे प्रशासकांच्या आदेशाची सत्यप्रत.

४६ जून २००४ शिक्षक हजेरी रजिस्टरची सत्यप्रत.

४७ जून २००४ या शैक्षणिक वर्षात आपल्या स्वाक्षरीने वेतनावाढ दिल्याचे शिक्षकेत्तर शिक्षक व कर्मचारी सेवापुस्तिकेच्या आपल्या स्वाक्षरीच्या सत्यप्रती व प्रशासकाच्या आदेशाी सत्यप्रत.

४८ आपल्या स्वत:च्या सेवापुस्तिकेची जून ०४ सत्यप्रत.

४९ आपण प्रशासकांच्या कार्यकाळात मुख्याध्यापिका सौ. दुबे सी. जी. यांना मा. शाळा न्यायाधिकरण, मा. उच्च न्यायालय खंडपीठ औ, येथे प्र. मु. अ. दर्शवले. मी प्र. मु. अ. होते प्रशासकांनी आपणास दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

५० विविध न्यायालयात पालकांचे अर्ज सादर करण्यास प्रशासकांनी आपणास दिलेल्या आदेशाची सत्यप्रत.

५१ सौ. दुबे सी. जी. आपणास प्रशासक नियुक्त मु. अ. या नात्याने केलेल्या अनेक पत्रावर प्रशासकांनी व आपण काय कार्यवाही केली त्या टिपणीसह सत्यप्रती.

५२ जुलै ०४ वेतन बंद करण्याचे प्रशासकांचे आदेशाची प्रत.

५३ वीस महिन्याचे व चालू महिन्याचे वेतन स्थगित ठेवण्याची कारणे व स्पष्टीकरण.

सदर माहिती अर्जदाराने  वर्ष २००४ या कालावधी करिता मागितली होती. अर्जदाराने सदर माहिती व्यक्तीशः घेवून जाणार किंवा त्यांना पोष्टाने अपेक्षित आहे या संदर्भात त्यांच्या मूळ अर्जात काहीही उल्लेख केला नाही.

अर्जदाराने तद्नंतर लागलीच दिनांक- १७-०२-२००६ रोजी कलम १९ (१) अन्वये अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले. वास्तविकतः जनमाहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसा पर्यंतची प्रतिक्षा केल्यानंतर अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांच्याकडून उत्तर प्राप्त न झाल्यास त्यांनी पहिले अपिल करावयास पाहिजे होते. तथापि त्यांनी प्रथम अपिल विहित मुदतीपूर्वीच केले आहे. ही अर्जदाराची कृती सर्वस्वी चुकीची आहे.

अर्जदाराच्या सदर अपिलावर अपिलिय अधिकारी यांनी काहीही निर्णय न दिल्यामूळे अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १०-०४-२००६ रोजी कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपिल केले आहे.

अर्जदाराने सदर व्दितीय अपिला मध्ये त्यांची मूळ माहितीची मागणी कायम ठेवून अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केली. हे कारण अर्जामध्ये दर्शविले आहे.

अर्जदार हया जयजंगदबा क्रिडा मंडळ या संस्थेमध्ये मुख्याध्यापिका म्हणून  त्या १६-६-१९९८ ते जानेवारी, २००४ पर्यंत कार्यरत होत्या. तद्नंतर या संस्थेच्या कारभाराविषयी तक्रारी प्राप्त झाल्याने शिक्षण संचालकानी या शाळेवर श्री.रमेश सुखदेव धनेगावकर यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली. या प्रशासकाने अर्जदार मुख्याध्यापिका यांना पदावरुन पदावनत करुन सहशिक्षीका पदी नेमणूक केली. तेंव्हा पासून अर्जदार हया संस्थेचे पदाधिकारी, शिक्षण विभागातील अधिकारी यांचे विरुध्द  तक्रारी करीत आहेत. अर्जदाराने एकूण ५३ मुद्यांवरील मागविलेल्या माहितीचे स्वरुप पहाता, ही सर्व माहिती अर्जदाराची सेवा ज्येष्ठता व त्यांची

मुख्याध्यापिका पदी नेमणूक व सहशिक्षीका म्हणून पदावनती यांच्याशी संबंधीत असल्याचे दिसते.

सर्व प्रथम या प्रकरणामध्ये अर्जदारास माहिती अधिका-याकडून माहिती प्राप्त नाही, प्रथम सुनावणी देखिल झाली नाही. परिणामी अर्जदारास त्यांच्या अधिकारा पासून बरेच काळा पर्यंत वंचीत राहावे लागेले आहे. या ठिकाणी असेहि नमूद करण्यात येते की, संबंधित शाळेचे जनमाहिती अधिकारी हे प्रकरणात सुनावणीच्या दिवशी वेळेवर हजर न राहता सुनावणी संपते वेळी हजर झाले आहेत.अर्जदारास वेळेत माहिती न देण्याची त्यांची या प्रकरणामधील कृती सर्वथा अयोग्य असल्याची आयोगाची खात्री झाली आहे. त्यांच्या या कृती बद्दल संबंधित जनमाहिती अधिकारी यांची प्रशासकिय चौकशी संबंधित प्राधिकरणाने करावी व सदर कार्यवाहीचे नियंत्रण, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी करावे व अनुपालन अहवाल आयोगाकडे पाठविण्यात यावा. असे आदेशीत करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## -निर्णय-

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अर्जदारास आवश्यक असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांची जबाबदारी वेळेवर व योग्यरित्या न पाळल्याने त्यांचेवर संबंधित प्राधिकरणाने प्रशासकीय चौकशी करावी व शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी या आदेशाचा अनुपालन अहवाल आयोगास ३ महिन्याचे आत पाठवावा.

औरंगाबाद, दिनांक- २० मार्च, २००७

( वि.बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.

प्रति-

१. सौ.छाया गोपाळराव दुबे , चैतन्य अपार्टमेंट, प्लॅट नं.१,व्यंकटेश मंगल कार्यालया गारखेडा परिसर, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासक, ओम प्राथमिक शाळा, एन-६, सिडको,औरंगाबाद यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/८६**
निर्णय दिनांक- २१ मार्च, २००७.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.कल्याण सोपानराव सोनवणे.<br>एन-११,के-४०/४, नवजीवन कॉलनी,<br>हडको, औरंगाबाद. | **--अपिलकर्ता** |

<u>विरुध्द</u>

| | | |
|---|---|---|
| **१.** | जन माहिती अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता (पश्चिम)<br>सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>औरंगाबाद. | **--उत्तरवादी.** |
| २. | अपिलीय अधिकारी तथा<br>अधिक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद. | |
| ३. | मुख्य अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,<br>औरंगाबाद. | -- साक्षीदार. |
| ४. | उपसचिव,<br>इमारती, सार्वजनिक बांधकाम विभाग,<br>मंत्रालय, मुंबई-३२. | --साक्षीदार. |

## -विवेचन-

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २१ मार्च, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. कल्याण सोपानराव सोनवणे (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल.) जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पश्चिम) सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद श्री.पी.के.पाटील व अपिलिय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोंधले जाईल.) श्री. पी.व्ही. पाटील हे हजर आहेत.

या प्रकरणात साक्ष देण्या कतिरा मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, औरंगाबाद व उपसचिव, इमारती, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना बोलाविले होते. त्यापैकी उप सचिव इमारती हे आज सुनावणीसाठी हजर आहेत.

मुख्य माहिती आयुक्त यांचे कार्यालयाकडून आलेल्या अर्जात अर्जदाराने प्रथमतः मागितलेल्या माहितीचा अर्जाचा समावेश नाही. अर्जदाराने सर्व प्रथम उपअभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर) यांचेकडून सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात झालेल्या कामाची तपशिलवार माहिती मागितली होती. अर्जदाराने ही माहिती सन २००२-२००६ पर्यंतची सर्व कामाच्या संदर्भात माहिती मागितली होती. अर्जदाराने मागितलेल्या माहितीचे वर्णनामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागा अंतर्गत २००२ पासून वैद्यकीय महाविद्यालय तथा रुग्णालयास किती अनुदान मंजूर केले त्याची सत्यप्रत, अनुदान कोणत्या कामासाठी मंजूर करण्यात आले त्या कामांची सत्यप्रत. सदर कामावर झालेला खर्च कामे केलेल्या कंत्राटदाराची, सहकारी संस्थेची यादी, कामे सुरु होण्याची व पूर्ण होण्याची तारीख, ज्या वैद्यकिय अधिका-याने कामाची पहाणी केली त्या अधिका-यांची नांवे व पदे, सदर कामाची मागणी वैद्यकीय अधिका-याने केली असल्यास त्या कामांच्या ठरावाची सत्यप्रत, संदर्भीय सर्व कामांच्या एम.बी. रेकॉर्डची सत्यप्रत. सन २००२ ते २००६ पर्यंत डॉक्टरांच्या निवासा करिता सदर कामासाठी केलेला

खर्च, कोणत्या बिल्डींगला रंग दिला   व ती कामे पूर्ण झाल्या बाबतची सत्यप्रत व काम पूर्ण झालेल्या बाबतचे शासकिय अधिकारी यांचे प्रमाणपत्र, या बाबींचा समावेश आहे. सदर माहिती अर्जदाराने व्यक्तीशः अपेक्षिली होती. अर्जदारास सदर अर्जात उपअभियंता यांनी दिनांक- ०३-०३-२००६ रोजी उत्तर दिले असून त्या माहितीसाठी अर्जदाने  रक्कम रुपये २,५००/- इतकी रकम ही माहिती देण्यापोटीचा खर्च म्हणून शासकिय तिजोरीत जमा करण्याच्या सूचना अर्जदारास दिल्या.

तदनंतर अर्जदाराने दिनांक- ०९-०३-२००६ रोजी सदर रकम शासकिय तिजोरीत भरली व तद्नंतर दिनांक- २८-०३-२००६ रोजी अर्जदारास ही माहिती मिळाली असे अर्जदाराने उपअभियंता यांना लेखी  स्वरुपात लिहून दिले आहे.

सदर माहिती अपूर्ण, अस्पष्ट असलयाचे अर्जदाराने उपअभियंता यांचे निदर्शनास दिनांक- २८-०३-२००६ रोजीच आणून दिले आहे.

सदर माहिती अपूर्ण व अस्पष्ट असल्याने अर्जदाराने उल्लेख केला परंतू या माहितीवर अर्जदाराने कोणतेहि अपिल अपिलिय अधिकारी यांचेकडे केले नाही. तथापि तद्नंतर दिनांक- १२-०६-२००६ रोजी संबंधित जनमाहिती अधिकारी व उपअभियंता याचंकडे माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये परत दुसरा अर्ज दिनांक- १२-०६-२००६ रोजी दिला. या अर्जामध्ये त्यांनी केलेल्या मागणीमध्ये थोडयाफार फरकाने वरिल माहिती कायम ठेवली. यात त्यांनी श्री.जी.बी.पोहेकर यांची नियुक्ती झाल्यापासून आजपर्यंत म्हणजे १२.०२.२००६ पर्यंत जी कामे करण्यात आली. त्या सर्व कामांचे नकाशे, अंदाजपत्रके कामे   करणा-या कंत्राटदारांचा तपशिल सर्व करारनाम्याच्या झेरॉक्सप्रती. एम.बी. रेकार्डच्या झेरॉक्सप्रती इत्यादी बाबतची माहिती मागितली आहे.

सध्या  या  ठिकाणी श्री.जी.बी.पोहेकर हे उपअभियंता कार्यरत आहेत.

यावर  अर्जदारास कोणतीहि माहिती प्राप्त न झाल्यामूळे, अर्जदाराने दिनांक- १५-०७-२००६ रोजी कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपिल केले. या अपिलामध्ये अर्जदाराने त्यांचे दिनांक- १२-०६-२००६ रोजीच्या माहितीची मागणी त्यांनी कायम ठेवली.

या अपिलावर सुनावणी  घेतल्याचे अपिलिय अधिकारी यांनी सांगितले. तथापि त्या प्रित्यर्थ ते कोणताहि पुरावा आयोगास सादर करु शकले नाहीत. यानंतर  स्पष्टीकरणामध्ये त्यांनी सदर सुनावणी उपकार्यकारी अभियंता यांनी दिनांक- ०७-०९-२००६ रोजी घेतल्याचे सांगितले. वास्तविकतः उपअभियंता हे अपिलिय अधिकारी म्हणून नियुक्ती केले गेले नसल्यामूळे उपअभियंता यांनी घेतलेली सुनावणी ही संपूर्णतः अवैध ठरते. त्यामूळे या प्रकरणी अर्जदाराने केलेल्या अपिलाची सुनावणी झाली नाही. या निष्कर्षाप्रत आयोग येवून ठेपला आहे.

तथापि अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती दिनाक- २६-०९-२००६ रोजी दिल्याचे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद (प.) यांनी सुनावणीच्या वेळी सांगितले. तथापि त्या पृष्ठयर्थ ते कोणताहि पुरावा सादर करु शकले नाही. याहि वेळी माहिती न मिळाल्यामूळे अर्जदाराने मंत्रालयातील जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक- २७-०९-२००६ रोजी याच माहितीच्या संदर्भात अर्जदाराने अर्ज केला. या अर्जामध्ये  देखिल त्यांनी आपली मूळ माहितीची मागणी थोडयाफार फरकाने कायम ठेवली आहे. या अर्जामध्ये अर्जदाराने एकूण चार मुद्यावर माहिती मागविली आहे. त्यापैकी मुद्दा क्रमांक-१ हा सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालयामध्ये संबंधीत आहेत. उर्वरित तीनहि मुद्दे सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांचेशी संबंधीत आहेत.

आज झालेल्या सुनावाणीमध्ये  सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालयातील संबंधित उपसचिव श्री.पी.बी.डांगे हे उपस्थित आहेत. त्यांनी आज साक्षीमध्ये सांगितले की, मंत्रालयाकडून वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय या करिता वेगळा निधी शासन स्तरावरुन उपलब्ध होत नाही, इमारतीच्या दुरुस्ती देखभालीसाठी एक ठोक रक्कम दर वर्षी संबंधित अधिक्षक अभियंता यांना अनुदानाव्दारे मंजूर केली जाते. या रकमेतूनच शासनाच्या सर्व इमारतींच्या दुरुस्ती देखभालीची कामे केली जातात. इमारत निहाय खर्चाचा तपशिल सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित क्षेत्रीय अधिकारी ठेवीत असतात व  सदर निधीचे नियंत्रण संबंधित अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे मार्फत केले जाते. सी.आर, एस.एल.आर या कार्यक्रमांतर्गत हाती घेतलेल्या

कामांना मान्यता अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ हे देतात व सदर काम कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे पर्यवेक्षणाखाली पार पाडले जाते.

अर्जदाराने त्यांचे दिनांक- २७-०९-२००६ रोजीच्या अर्जाव्दारे मागितलेली संपूर्ण माहिती अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांचेकडे उपलब्ध आहे असे उपसचिव यांनी आयोगा समोर झालेल्या साक्षीत कबुल केले आहे.

तद्नतर मंत्रालयात सदर अर्ज प्राप्त झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागातील जनमाहिती अधिकाकरी यांनी सदर अर्ज दिनांक- २९ सप्टेंबर, २००६ रोजी अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचेकडे पुढील कार्यवाहीस्तव पाठविला व त्याप्रमाणे अर्जदारास कळविले.

अर्जदाराने अशा त-हेने सर्व कार्यालयाकडे, मंत्रालयाकडे वेळोवेळी मागणी करुनहि अर्जदाराला त्याला हवी असलेली माहिती दिली गेली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन स्पष्ट होते. किंबहूना सदर अर्जदार त्याला आवश्यक असलेल्या माहितीपासून त्यास जाणीवपूर्वक वंचीत ठेवले गेले, असे म्हटल्यासहि वावगे ठरणार नाही.

तद्नंतर अर्जदाराने राज्य माहिती आयोगाकडे दिनांक- १६-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले असून या अपिलामध्ये अर्जदाराने त्याची मूळ माहिती थोडयाफार फरकाने कायम ठेवली आहे व अवर सचिव (ईमारती) सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई यांचेवर प्रतिदिनी २५०/-रुपये दंडात्मक कार्यवाही करण्याची विनंती केली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये उपलब्ध करुन दिलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, अर्जदारास आवश्यक असलेली माहिती त्याला वेळेवर दिली गेली नाही. त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या अपिलावर कार्यकारी अभियंता यांनी योग्य प्रकारे सुनावणी घेतली गेली नाही. स्वतःच्याच कार्यालयातील उपअभियंता यांनी की, जे अपिलिय अधिकारी नाहीत, यांचेकरवी अपिलाची सुनावणी घेतली गेली. जी संपूर्णतः अवैध व अदखलपात्र ठरते. थोडक्यात अर्जदारास आवश्यक

असलेल्या माहिती पासून जनमाहिती अधिकारी यांनी वंचित ठेवून मुदतीमध्ये माहिती पुरविली नसल्याचे जास्त स्पष्ट होते.

यावर अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांनी या अर्जाची सुनावणी दिनांक- १६-१२-२००६ रोजी घेतली व सदर सुनावणीमध्ये त्यांनी अर्जदारास सात दिवसाच्या आत माहिती द्यावी. असा निर्णय दिला आहे. सदर निणूय त्यांनी दिनांक- २६ डिसेंबर, २००६ रोजी सर्व संबंधितास कळविला आहे. तथापि अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ औरंगाबाद यांनी सूचना देवून देखील जनमाहिती अधिकारी यांच्याकडून अर्जदारास माहिती उपलब्ध होवू शकली नाही. कार्यकारी अभियंता, उपअभियंता यांनी या प्रकरणी केलेले वर्तन केवळ अशोभनीय नव्हे तर बेजबाबदार पणाचे ठरते, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. सचिव (सार्वजनिक बांधकाम) यांनी याची नोंद घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

सुनावणीमध्ये असे सिध्द झाले आहे की, अर्जदाराने वेगवेगळया प्राधिकरणाकडे अर्ज केले आहे. अर्जदारास माहिती मिळविण्यापासून वंचित राहिल्याची खात्री झाल्यामूळे अर्जदाराचा सदर अर्ज माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल करण्यात येत असून असे आदेशीत करण्यात येते की, अर्जदाराने ज्या ज्या वेळी , ज्या ज्या माहिती करिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडे , अधिक्षक अभियंता यांचेकडे, व मंत्रालयीन विभागाकडे मागणी केली आहे ती सर्व माहिती अर्जदारास सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्यात यावी.

अर्जदाराने अवर सचिव, (इमारती) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रतिदिन २५०/- रुपये शास्ती लावण्याची विनंती केलेली आहे परंतू सदर माहिती ही अवर सचिव (ईमारती) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, यांचेकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी दिली नाही, अर्जदाराने चुकीच्या प्राधिकरणाकडे माहितीचा अर्ज केला असल्यामूळे अर्जदाराने अवर सचिव

(इमारती) यांना शास्ती लावण्याची आयोगास केलेली विनंती फेटाळण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. अर्जदारास संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी सात दिवसाच्या आत सर्व माहिती विनामूल्य द्यावी.

औरंगाबाद, दिनांक- २१ मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार श्री.कल्याण सोपानराव सोनवणे, एन-११,के-४०/४, नवजीवन कॉलनी, हडको, औरंगाबाद.
२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पश्चिम) औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता , सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन औरंगाबाद यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
५. उपसचिव, इमारती, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांना वरील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
६. सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय मुंबई-३२, यांनी विवेंचनातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करण्यासाठी.
७. श्री.दौड,सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय,, १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
८. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/८७
निर्णय दिनांक- २१ मार्च, २००७.

१. श्री.अशोक गुलाबराव खोसरे --अपिलकर्ता.
छत्रपती चौक, पुंडलीकनगर,
औरंगाबाद.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी.
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, औरंगाबाद.

२. अपिलिय अधिकारी तथा
विभागीय सह निबंधक
सहकारी संस्था, औरंगाबाद.

**-विवेचन-**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २१ मार्च, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री.अशोक गुलाबराव खोसरे (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल) हे गैरहजर होते. जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद (येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) श्री.आर.पी.सुरवसे तसेच अपिलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री.सुभाष माने हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक- १०-१०-२००६ रोजी प्रथम अर्ज माहिती अधिकार कायदा २००५ अन्वये दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने खालील प्रमाणे माहिती मागविली आहे.

> " गजानन मजूर सहकारी संस्था तपोवन, ता.कन्नड, जिल्हा- औरंगाबाद , राजीव गांधी मजूर सहकारी संस्था, गलवाडा, तालूका- सोयगाव, श्रीराम मजूर सहकारी संस्था, शिरोडी तालूका फुलंब्री, जिल्हा औरंगाबाद या संस्थेचे ऑडिट मेमो, उपविधीच्या प्रती मिळणे बाबत व अप्पाराव नामदेवराव घुगे, बाबूराव वाळूबा घुगे, प्रभाकर दयाळराव काळे यांचे सभासद होण्यासाठी केलेले अर्ज व त्यांचे गुत्तेदार नसल्याचे (बी.ॲण्ड सी.) चे प्रमाणपत्र व हे सर्व सभासद झालयाचे ए.आर.चे मान्यतेचे पत्र मिळणे बाबत.

सदर माहिती अर्जदाराने प्रत्यक्षात अपेक्षिली आहे. माहितीचा कालावधी या अर्जामध्ये उल्लेख केलेला नाही.

अर्जदाराच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक- १८-१०-२००६ रोजी अर्जदारास " सदर माहिती संबंधीत संस्थास्तरावरील आहे. सदर सहकारी संस्था हया तालूका स्तरावरील आहेत. कृपया प्रथम आपण संबंधित संस्थेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी. जर मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही अथवा नाकारली असल्यास आपणासा संबंधित तालूक्याचे सहायकनिबंधक यांचे कार्यालयात अपिल दाखल करता येईल. तरी आपण संबंधीत संस्थेकडे स्वतंत्ररित्या अर्ज करुन आपणास हवी असलेली माहिती प्राप्त करुन घ्यावी. सबब, आपला अर्ज या कार्यालयाच्या स्तरावर निकाली काढण्यात येत आहे. "

जनमाहिती अधिकारी यांच्या वरिल निर्णयावर समाधान न झाल्याने अर्जदाराने जन-अपिलिय अधिकारी यांचेकडे दिनांक- ०६-०१-२००७ रोजी प्रथम अपिल केले.

या अपिलावर जनअपिलिय अधिकारी यांनी दिनांक- १७-०१-२००७ रोजी सुनावणी घेवून अर्जदाराचे अपिल फेटाळले.

यावर व्यथीत होवून अर्जदाराने दिनांक- २५-०१-२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल केले आहे. या अपिलामध्ये त्यांनी त्यांचे मूळ अर्जातील मागणी सर्वसाधारणत: कायम ठेवली आहे.

आज झालेल्या सुनावणीमध्ये जनमाहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदाराने ज्या संस्थेच्या संदर्भात माहिती मागविली होती ती माहिती त्या त्या संस्थे कडेच उपलब्ध असून प्रत्येक संस्थेस वेगवेगळी अशी अधिकारीता आहे व त्याच बरोबर या सर्व संस्था तालूका स्तरावरील असल्याने ही माहिती अर्जदारास संबंधित संस्थेकडूनच मिळू शकेल. या संस्था माहिती अधिकारी वेगवेगळे असून सहकार आयुक्त, पुणे यांनी त्यांचे आदेश क्रमांक- जा.क्र.अंबनि/केंमा.अ./शा.प्रा.अ./२००५, दिनांक- २१-०९-२००५ रोजीच्या आदेशा अन्वये त्यांच्या नियुक्त्या केलल्या आहेत. याच आदेशा मध्ये तालूकास्तरावरील सर्व संस्था करिता सहायकनिबंधक सहकारी संस्था हे अपिलिय अधिकारी आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्या युक्तीवादास विभागीय सह जिल्हानिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी दुजोरा दिला.

या प्रकरणी प्रत्येक सहकारी संस्थेस स्वतंत्र अधिकारीता व जनमाहिती अधिकारी असल्यामूळे अर्जदाराने संबंधित संस्थे कडून माहिती प्राप्त करुन घ्यावी व त्यावर त्यांचे जर समाधान झाले नाही तर त्यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांचेकडे प्रथम अपिल करावे व त्यानंतरहि समाधान न झाल्यास किंवा सदर माहिती चुकीची व अपूरी असल्याचे त्यांना खात्री वाटल्यास किंवा सदर माहिती विलंबाने मिळाल्यास त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल करणे योग्य ठरेल.

या प्रकरणी अर्जदाराने त्याला जी माहिती हवी आहे ती मिळविण्याकरिता चुकीच्या प्राधिकरणाकडे अर्ज केलेला दिसत आहे. त्यामूळे त्यांचे अपिल आता निकाली काढयाचे आदेशीत करण्यात येत आहे.

अर्जदारास माहिती हवी असल्यास वर परिच्छेदात उल्लेखिल्या प्रमाणे त्यांने कार्यवाही करावी. असे त्याला सुचविण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात आले आहे.

२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था औरगाबाद  किंवा सहकार विभाग यांनी त्यांचे अखत्यारीतील अशा प्रकारच्या संस्थांचे जनमाहिती अधिकारी, जन अपिलिय अधिकारी यांची नांवे, हुद्दे इ.तपशील सर्व सामान्यांना माहित होईल, अशा त-हेने प्रसिध्द करावा.

औरंगाबाद, दिनांक- २१ मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार श्री.अशोक गुलाबराव खोसरे, छत्रपती चौक, पुंडलिक नगर, औरंगाबाद
२. जनमाहिती अधिकारी तथा सहजिल्हा निबंधक, सहकारी संस्था,औरंगाबाद यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
३. अपिलिय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, औरंगाबाद यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.
४. श्री.दौंड,  सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.
५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

अपील क्रमांक- २००७/९०
निर्णय दिनांक- २२ मार्च, २००७.

१. देशमुख हनुमंत वसंतराव --अपिलकर्ता.
व्दारा/- कनकदंडे निवास, सरकारवाडा,
अंबावेस, परळी वैजनाथ जि.बीड.

विरुध्द

१. जन माहिती अधिकारी तथा -- उत्तरवादी.
स्वामी विवेंकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा, जि.जालना.

२. अपिलिय अधिकारी तथा
प्राचार्य,
स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,
मंठा, तालूका- जालना.

**-विवेचन-**

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ मार्च, २००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री.देशमूख हनुमंत वसंतराव (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल) हे हजर होते. जनमाहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा ता.जालना (येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल ) हे

गैरहजर आहेत. तसेच अपिलीय अधिकारी तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा जि.जालना (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) श्री. बी.डी.खंदारे, हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदार यांनी सर्व प्रथम दिनांक- ०३-११-२००६ रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे स्वतःचे सेवा वेतन नेमणूक इत्यादी तपशिला संदर्भात खालील प्रमाणे माहिती मागविली होती.

"१) प्रा.देशमुख एच.व्ही. समाजशास्त्र यांचा दि. २३.९.१९९३ ते दि. ८.४.१९९५ या कालावधीत केलेल्या अध्यापन सेवेचा प्रस्ताव मा.संचालक (विकास समिती) डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे सेवा मानयता परवानगी बाबत महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावाची सत्यप्रत द्यावी.

२) मा. संचालक (विकास समिती) विद्यापीठ औरंगाबाद यांनी प्रा.देशमुख एच.व्ही. समाजशास्त्र यांच्या सेवा मान्यता बाबत महाविद्यालयास दिलेल्या निर्णयाची सत्यप्रत द्यावी.

३) प्रा.देशमुख एच.व्ही , समाजशास्त्र यांना आजपर्यंत अध्यापन सेवामान्यता व वेतन यापासून वंचीत का ठेवण्यांत आले? याबाबत स्वयंस्पष्ट लेखी खुलासा द्यावा.

४) प्रा.देशमुख एच.व्ही. समाजशास्त्र यांचा सेवामान्यता प्रस्ताव प्रलंबीत आहे का? किंवा सेवामान्यता दिलेली आहे किंवा नाही ? याबाबत स्वयंस्पष्ट लेखी खुलासा द्यावा.

५) प्रा.देशमुख एच.व्ही. यांना सेवामान्यता व वेतन यापासून वंचीत ठेवण्यास जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांची संपूर्ण नांवे व पद याबाबत खूलासा.

६) प्रा.देशमुख एच.व्ही. समाजशास्त्र यांच्या सेवामान्यता प्रस्तावास किती कालावधी त सेवा मान्यता कारवाई होणे बंधनकारक होते? याबाबत लेखी खूलासा द्यावा.

७) देशमुख एच.व्ही. समाजशास्त्र यांच्या १९९३-९४, १९९९४-९५ अध्यापन सेवा आदेशाची सत्यप्रत द्यावी.

अर्जदाराच्या माहितीच्या या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास दिनांक- २०-११-२००६ रोजी प्रथम माहिती पुरविली. तथापि ही माहिती चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे अर्जदारास वाटलयावरुन अर्जदाराने जन अपिलिय अधिकारी यांच्याकडे कलम १९ (क) अन्वये प्रथम अपिल दिनांक- २७-११-२००६ रोजी केले. सदर अपिलाची अपिलिय अधिकारी यांनी कोणत्याहि प्रकारची सुनावणी न घेता व अर्जदारास त्यांची बाजू मांडण्याची संधी न देता अर्जदारास दिनांक- ०४-०१-२००७ रोजी साधे पत्र दिले आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी " संबंधीत माहिती अधिकारी यांनी आपणास दिलेली माहिती महाविद्यालयातील अभिलेख व नोंदणी याची तपासणी केली व दिलेली माहिती योग्य व सदोष असल्याचे निदर्शनास आले आहे." व पुढे " आपणास आवश्यक असलेल्या बाबी महाविद्यालयाच्या कक्षेत येत नसल्यामूळे महाविद्यालय त्या माहितीचा खुलासा करु शकत नाही " असे म्हटले आहे.

जनमाहिती अधिकारी यांची अपिल ठरविण्याची ही कृती चुकीची आहे. त्याच बरोबर त्यांनी वरील उत्तरामध्ये अर्जदारास जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती " सदोष" असल्याचे त्यांनी लेखी पत्रात कबूल केले आहे. आजहि ते सुनावणीमध्ये "सदोष" याचा अर्थ कोणताहि दोष नसलेली असा खुलासा करत आहेत. या प्रकरणाची पूर्वपिठिका खालील प्रमाणे आहे.

" स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय हे सप्टेंबर १९९३ मध्ये स्थापन झाले. सुरुवातीच्या काळात या महाविद्यालयात श्री.देशमूख यांची अधिव्याख्याता म्हणून तासिका तत्वावर दिनांक- ०५-०९-१९९३ रोजी नेमणूक करण्यात आली होती. तद्नंतर दिनांक- २३-०८-१९९४ रोजी नियमीत वेतनश्रेणीत अधिव्याख्याता म्हणून नेमणूक करण्यात आली होती. श्री.देशमूख यांची सुरुवातीची नेमणूक स्थानिक निवड समिती मार्फत करण्यात आली होती. तद्नंतर प्राध्यापकाच्या

सेवा नियमित करण्याच्या दृष्टीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद च्या समितीने श्री.देशमूख यांना सदर पदाकरिता अपात्र ठरविले. तथापि दुसरा उमेदवार उपलब्ध नसल्याने तात्पुरती सोय म्हणून श्री.देशमूख यांना दिनांक- २३-०८-१९९४ रोजी नियमीत वेतनश्रेणीत नेमणूक दिली. तथापि तद्नंतर श्री.देशमूख यांची अधिव्याख्याता समाजशात्र या पदावर नियमीत नेमणूक होवू शकली नाही. सदर पदास आवश्यक असणा-या शैक्षणिक पात्रता श्री.देशमूख हे धारण करीत आहे असे देशमूख यांचे म्हणणे आहे. तर श्री.देशमुख यांची अधिव्याख्याता पदावर निवड, विद्यापिठ स्तरावरील समितीने केली नाही. असे स्वामी विवेंकानंद महाविद्यालय मंठा हया संस्थेचे म्हणणे आहे. श्री.देशमूख यांनी त्यांचेवर झालेल्या कथीत अन्याया बाबत योग्य त्या प्राधिकरणाकडे न्याय मागवावा, असे त्यांना आजच्या सुनावणीमध्ये सूचीत करण्यात आले. त्याच बरोबर त्यांचेवरील अन्याय दूर होण्याच्या दृष्टीने त्यांना त्यांच्या वरील महाविद्यालयाकडील उपलब्ध नस्त्यांमधील आवश्यक असलेली कागदपत्रे पहाण्याकरिता या प्रकरणा संदर्भातील सर्व पत्रव्यवहार व सर्व नस्त्या अर्जदारास, जनमाहिती अधिकारी तसेच प्राचार्य यांनी, अर्जदारास अर्जदाराची त्या प्रमाणे विनंती प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार २००५ मधील तरतुदीनूसार व एक दिवसाचे आत उपलब्ध करुन द्याव्यात, असे आदेशित करण्यात येत आहे. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात आले आहे.

२. अर्जदारास जनमाहिती अधिकारी तसेच प्राचार्य यांनी अर्जदाराची विनंती प्राप्त झाल्यानंतर माहिती अधिकार २००५ मधील तरतुदीनूसार एक दिवसाचे आत अर्जदारास पहाणीसाठी महाविद्यालयाकडील या विषया संदर्भातील सर्व नस्त्या उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद, दिनांक- २२ मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**प्रत-**

१. अर्जदार देशमूख हनुमंत वसंतराव व्दारा/- कनकदंडे निवास, सरकारवाडा, अंबावेस परळी वैजनाथ, जिल्हा- बीड.

२. जनमाहिती अधिकारी तथा अधिव्याख्याता, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा ता.मंठा जि.जालना, यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा प्राचार्य, स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय, मंठा ता.मंठा, जिल्हा- जालना, यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १३ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई ४०० ००३२ यांना सदर निर्णय शासनाच्या वेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

५. निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद यांच्या समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

**अपील क्रमांक-२००७/९२**
निर्णय दिनांक- २२ मार्च, २००७.

**१.** डॉ.श्रावण जयराम जाधव **-अपिलकर्ता.**
हॉटेल साई टुरिस्ट कोपरगाव
जिल्हा- अहमदनगर.

**विरुध्द.**

**१.** जनमाहिती अधिकारी तथा **- उत्तरवादी.**
तहसीलदार, (महसूल शाखा)
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर

२. अपिलिय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
अहमदनगर.

## -विवेचन-

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक- २२ मार्च,२००७ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अर्जदार श्री. श्रावण जयराम जाधव (येथून पुढे अर्जदार म्हणून संबोधले जाईल.) हे गैरहजर आहेत परंतू त्यांचेवतीने प्राधिकारपत्र घेवून त्यांचा मुलगा श्री.विक्रम श्रावण जाधव हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, (महसूल शाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, ( येथून पुढे जनमाहिती अधिकारी म्हणून संबोधले जाईल.)

श्री. आर.आर.शेंडे व अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, अहदमनगर (येथून पुढे अपिलिय अधिकारी म्हणून संबोधले जाईल.) डॉ.भाऊसाहेब दांगडे हे हजर आहेत.

या प्रकरणी अर्जदाराने सर्व प्रथम दिनांक- ०६-०३-२००६ रोजी जिल्हाधिकारी अहमदनगर यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मिळविण्यासाठी माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार अर्ज केला होता.

अर्जदाराने वास्तविकतः हा अर्ज जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित जनमाहिती अधिकारी यांच्याकडे करावयास हवा होता. तथापि त्यांनी तसा अर्ज न करता जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्याकडे सरळ अर्ज केला आहे. मागितलेली माहिती कोपरगाव येथील सर्वेनंबर १० चा मालकी हक्क, सध्याचा वापर इत्यादी संदर्भात आहे.

" १) सदर क्षेत्र सर्व जमाती साठी खुले राहील.

२) सदर क्षेत्राचा शैक्षणीक कामासाठीच उपयोग करावा. सदर क्षेत्राचा वापर वरदील अटीशर्तीनूसार केला जात नाही.

अे) सदर क्षेत्राचा वापर वरील अटीशर्तीनूसार केला जात नाही तरी सुध्दा या क्षेत्राला बीगर शेती सारा माफ कसा? माहिती द्यावी.

बी) जागेचा वापर अटीशर्तीनुसार होतो आहे की नाही याची प्रशासनाने केंव्हा केंव्हा पहाणी केली याची माहती द्यावी.

सी) हया बीगरशेती असलेल्या ८ हे ६२ आर क्षेत्रातील दोन एकर क्षेत्रात एरिगेशनचा गार्डन ब्लॉग ही आहे व त्याच दोन एकर क्षेत्रात रयत सेवक ची इमारत, कॉलेजचे कॅन्टीन, गेस्टहाऊस हया कमर्शिअल इमारती आहेत तर सर्व्हे नं १० ला बीगरशेती सारा मार्फ कसा? माहिती द्यावी.

डी) सर्व्हे नंब.१० मधिल काही इमारती कॉजेजने रयत सेवक संस्थेमध्ये कॅन्टीनसाठी डीपॉजीट घेवून दरमहा भाडयाने.

इ) संपुर्ण क्षेत्र बीगरशेती कडे वर्ग असतांना एरीगेशन चा दोन एकर बारमाही गार्डन ब्लॉक अटीशर्तीचा भंग करुन १९८२ पासून कसा दिला ?

एन.ए. जमीनीत एरीगेशन चा पाटपाण्याचा बारमाही ब्लॉक कोणत्या नियमानूसार दिला त्याची माहिती द्यावी.

रेव्हेन्युच्या कोणत्या कायद्याखाली कोणकोणत्या कारणासाठी रेव्हेन्यु माफ मीळतो माहिती द्यावी.

भरमसाठ फीचे मोबदल्यात शिक्षण, एन.ए. जमीनीत एरिगेशन चा ब्लॉक व त्याच ब्लॉकच्या जमीनीत रयत सेवक बँकेला इमारत १२०००/- दरमहा पोटभाडे देवून जागेचा वापर होत आहे. अटीशर्तीचा भंग झालेला तेंव्हा शासनाच्या महसुल वसुलीसाठी कोणती कायदेशिर कारवाई केलेली आहे याची माहिती द्यावी. हे पत्र माहितीचा अधिकार २००५ चे अर्जासोबत देत आहे. मुदतीत माहिती देवून सहकार्य करावे."

सदर माहितीचे स्वरुप पाहिले असता सदर माहिती अर्जदाराने प्रश्नार्थक स्वरुपात केली आहे. त्यावरुन अर्जदाराला सर्वेनंबर १० च्या संदर्भात असलेला शेतसारा, सदर भूखंडावर बांधण्यात आलेले रयतसेवक संस्था कॉलेज कँटीग , गेस्टहाऊस, रयतसेवक संस्थेची बँकेची इमारत,इत्यादी प्रकारच्या बांधकामा संदर्भात माहिती हवी असल्याचे दिसते. या भूखंडाला बिगर शेतसारा माफ कसा केला व त्याचबरोबर एन.ए. झालेल्या भूखुडाचा बारमाई ब्लॉक इरिगेशन कसा केला गेला. वगैरे प्रक्रिया संदर्भात अर्जदारास माहिती हवी असल्याचे दिसते.

अर्जदाराच्या या अर्जावर जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक १६/२००६, दिनांक- १७-०३-२००६ रोजी अर्जदारास दिनांक- ०६-०३-२००६ रोजीच्या अर्जा संदर्भात कार्यवाही करण्यात येत असून कार्यवाही नंतर अर्जदारास खुलासा करण्यात येणार असल्याचे पुढे कळविले आहे. तद्नंतर आजतागायत म्हणजेच अपिलाच्या सुनावणीच्या तारखे नंतर देखील संबंधीत कार्यालयाने अर्जदारास कोणत्याहि प्रकारची माहिती दिली नसल्याचे उपलब्ध कागदपत्रावरुन दिसून येत नाही.

अर्जदारास त्याने केलेल्या अर्जावर कोणतेही उत्तर प्राप्त न झाल्याने अर्जदाराने दिनांक- २७-११-२००६ रोजी माहिती अधिकार कायदा २००५ मधील कलम १९ (१) अन्वये प्रथम अपिल केले. तथापि या प्रकरणी महसूल विभागीय आयुक्त नाशीक विभाग नाशीक हे अपिलिय अधिकारी नसल्याने त्यानी हे अपिल दिनांक- ०१-१२-२००६ रोजी अपिलिय अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडे सुनावणीस पाठविले. या अपिलावर अपिलिय अधिकरी यांनी दिनांक- २०-१२-२००६ रोजी सुनावणी घेतली व या सुनावणीचा निकाल अर्जदारास दिनांक- ०८-०१-२००७ रोजी कळविला. या निकालामध्ये अर्जदाराचे अपिल प्रथम अपिलिय अधिकारी यांनी फेटाळले आहे. सदर अपिल फेटाळतांना अर्जदाराचा हे अपिल करतांना तक्रार करण्याचा उद्देश स्पष्ट होतो तसेच अर्जदारास आवश्यक असलेली माहिती बाबत अर्जदार योग्यत्या कायद्याचा अभ्यास करुन माहिती मिळवू शकतात. अर्जदाराने केलेल्या तक्रारीच्या संदर्भात तहसीलदार, कोरपगांव यांच्याकडून सविस्तरच चौकशी करण्यात येत आहे. अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे. त्याच बरोबर अर्जदारास नेमकी कोणत्या प्रकारची माहिती हवी आहे, याचा स्पष्टपणे उल्लेख केलेला नाही. हे कारण अपिलिय अधिकारी यांनी सदर अपिल फेटाळतांना पुढे केले आहे.

यावर व्यथीत होवून सदर अर्जदार यांने राज्य माहिती आयोगा कडे दिनांक- २३-०१-२००७ रोजी व्दितीय अपिल केले आहे. आज आयोगा समोर झालेल्या युक्तीवादामध्ये अर्जदारास त्यांना

निश्चीतपणे कोणती माहिती हवी आहे, याचा त्यांना माहितीच्या अधिकारा संदर्भात आधार घेवून माहिती मिळवितांना, उल्लेख केला पाहिजे. असे अर्जदार यांना सांगण्यात आले. तव्दतच माहिती अधिकारी यांना कोणत्याही प्रकारचा खुलासा मागणी किंवा त्यांच्या कृती बद्दल कारणमिंमासेची माहिती मागणे, हे माहिती अधिकार कायदा २००५ मध्ये अभिप्रेत नाही. हेहि अर्जदारास स्पष्ट करण्यात आले. त्याच बरोबर अर्जदाराने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जात जी माहिती मागविली आहे व त्या माहितीची अपेक्षा केली आहे. अशी माहिती अर्जदारांना या विषया संदर्भातील ज्या नस्त्या मध्ये उपलब्ध आहे. त्या सर्व नस्त्या अर्जदारास दिनांक- ३१-०३-२००७ पूर्वी उपलब्ध करुन देण्याची तयारी जनमाहिती अधिकारी व अपिलिय अधिकारी या दोघांनी दर्शविली आहे व त्यास अर्जदाराने संमती दर्शविली आहे. तेंव्हा आता असे आदेशीत करण्यात येत आहे की, जनमाहिती अधिकारी यांना अर्जदाराने लेखी विनंती केल्यानंतर माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतूदीनूसार कोपरगाव येंथील सर्वेनंबर १० या प्रकरणातील सर्व नस्त्या अर्जदारास दिनांक- ३१-०३-२००७ पूवी उपलब्ध करुन द्याव्यात. जेणेकरुन अर्जदार त्यास हवी असलेली सर्व माहिती त्यामधून घेवू शकेल. तसेच या प्रकरणातील अर्जदाराच्या अर्जाची दखल न घेणा-या तहसीलदार, कोपरगांव यांचे विरुध्द यथायोग्य प्रशासकिय कार्यवाही जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी करावी. सबब खालील प्रमाणे निर्णय पारीत करण्यात येत आहे.

## निर्णय

१. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२. अर्जदाराने लेखी विनंती केल्यास माहिती अधिकार कायदा २००५ मधील तरतुदीनूसार अर्जदारास दिनांक- ३१ मार्च, २००७ पूर्वी सर्वेनंबर १० प्रकरणा संदर्भातील सर्व नस्त्या, पत्रव्यवहार पहाणीसाठी उपलब्ध करुन द्याव्यात.

औरंगाबाद, दिनांक- २२ मार्च, २००७

**( वि.बा.बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त, औरंगाबाद.**

**<u>प्रत-</u>**

१. डॉ.श्रावण जयराम जाधव, हॉटेल साई टुरिस्ट, कोपरगाव जि.अहमदनगर

२. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार (महसूलशाखा) जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

३. अपिलिय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

४. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना निकाल पत्रातील अभिप्रायाची नोंद घेण्यासाठी.

५. श्री.दौंड, सचिव, मुख्य माहिती आयुक्त, कार्यालय १२ वा मजला नवीन प्रशासकीय इमारत मंत्रालया समोर, मुंबई -३२ यांना सदर निर्णय शासनाच्या बेब साईटवर प्रसिध्द करण्यासाठी.

**६.** निर्णयनस्ती.

**राज्य माहिती आयुक्त औरंगाबाद/नाशिक**